। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २५८ वा । शनिवार दिनांक २७ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील रद्द अर्जांची फेरछाननी ; विमा कंपन्यांवर कारवाईचा इशारा

### जिल्हास्तरीय आढावा व तक्रार निवारण समितीची बैठक संपन्न



धाराशिव, (जिमाका) - प्रधानमंत्री पीक विमा योजना,खरीप हंगाम २०२५ अंतर्गत जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय आढावा समिती व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती यांची संयुक्त बैठक नुकतीच संपन्न झाली.या बैठकीस संबंधित पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी, जिल्हास्तरीय आढावा समिती व तक्रार निवारण समितीचे सदस्य, आपले सरकार सेवा केंद्राचे जिल्हा व तालुकास्तरीय प्रतिनिधी तसेच कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजना,खरीप २०२५ हंगामातील अंमलबजावणीबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.यामध्ये पीक विमा अर्ज स्वीकृती,पात्रता व अपात्रता,विमा कंपनीकडून घेण्यात आलेले आक्षेप तसेच शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी यावर सखोल चर्चा करण्यात आली. जिल्हास्तरीय आढावा समितीच्या बैठकीत सुकाणू समितीने यापूर्वी घेतलेल्या निर्णयांवर चर्चा करण्यात येऊन ते निर्णय जिल्हास्तरीय समितीने कायम ठेवले. जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या बैठकीत विमा कंपनीकडून माहे जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रद्द करण्यात आलेल्या एकूण १२ हजार ३५३ पीक विमा अर्जांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.अनेक प्रकरणांमध्ये विमा कंपनीकडून घेतलेले आक्षेप तांत्रिक व तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे असल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी यांनी अपात्र ठरविण्यात आलेल्या सर्व अर्जांची शेतकरीनिहाय व कारणनिहाय सविस्तर माहिती संबंधित तालुकास्तरीय समितीस तात्काळ उपलब्ध करून देण्याचे,तसेच तालुकास्तरीय समितीने या अर्जांची सात दिवसांच्या आत सखोल छाननी करून अहवाल जिल्हास्तरीय समितीस सादर करण्याचे आदेश दिले.

छाननीदरम्यान विमा कंपनीकडून चुकीचे अथवा अन्यायकारक आक्षेप घेतल्याचे आढळून आल्यास संबंधित विमा कंपनीविरुद्ध प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असे आदेश जिल्हाधिकारी श्री.पूजार यांनी दिले. तसेच रद्द करण्यात आलेल्या अर्जांची त्रुटीपूर्तता करून संबंधित अर्जदारांना योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी एक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विमा कंपनीने योग्य ती कार्यवाही करण्याचेही आदेश देण्यात आले.

विमा कंपनीमार्फत विविध कारणांमुळे रिव्हर्ट (परत) आलेल्या पीक विमा अर्जांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.याअनुषंगाने जिल्हाधिकारी श्री.पूजार यांनी सर्व आपले सरकार सेवा केंद्र चालकांना स्पष्ट निर्देश दिले की,शेतकऱ्यांचे रिव्हर्ट झालेले अर्ज तातडीने तपासून आवश्यक पूर्तता करून ते विहित कालमर्यादेत पुन्हा सादर करावेत. केवळ तांत्रिक कारणांमुळे शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित राहू नयेत अथवा अपात्र ठरू नयेत,यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश आपले सरकार सेवा केंद्र जिल्हा प्रतिनिधींना देण्यात आले.

## अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गणेश रा. कमानवेस तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२५.१२.२०२५ रोजी कमान वेस पासुन धाराशिव रोड कडे जाणारे रोडलत तुळजाईनिवास गुरुदेव दत्त पान स्टॉल येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ डायरेक्टर पान मसाला, विमल पान मसाला एकुण ४८० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आला. तर योगिराज रा.सिंदफळ, ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२५.१२.२०२५ रोजी १९.०० वा. सु.गाटे हॉस्पीटल समोर रोडचे पश्चिम बाजूस तुळजापूर येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य तत्सम पदार्थ पान मसाला एकुण ६०० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## धमकी देवून तिच्यावर केला लैंगीक अत्याचार

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत २९ वर्ष महिला दि.१९.११.२०२५ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने गाडीवर घेवून जावून आडरानात मुलीस धाक दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी देवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२३.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पांडुरंग रा. दहिटणा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी १०.५० वा. सु. दहिटणा येथे मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी धाराशिव यांचे शस्त्र बंदी आदेशाचे उल्घन करुन लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक सत्तुर ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे- नवनाथ तुकाराम चाबुकस्वार, नेमणुक पोलीस ठाणे नळदुर्ग यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह भा.न्या.सं.कलम १३५ मपोका अन्वये नळदुर्ग पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅक्टर ट्रॉलीची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आनंद दत्तात्रय येवले, वय २५ वर्षे, रा.बावी ता. वाशी जि. धाराशिव यांची यांची अंदाजे ६०,००० किंमतीची पाच टन क्षमता असलेली लाल रंगाची ट्रॅक्टरची ट्रॉली एआय- बीएसआय-१६४४ ही दि. २२.१२.२०२५ रोजी ११.०० वा. सु. बसस्थानकाचे बाजूला असलेले विठु माउली गॅरेज दुकानासमोरुन अज्ञात दोन व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आनंद येवले यांनी दि.२४.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कमेची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- श्रीराम बाबुराव गरड, वय ३५ वर्षे, रा.पाचपिंपळा ता. परंडा जि. धाराशिव यांचे राहते घराचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२४.१२.२०२५ रोजी पहाटे तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम ५०,००० व गावातील उस तोड मजुर मुकेश ईदु भिलचंद्र रा. मेढाराना राज्य मध्ये प्रदेश ह.मु. पापिंपळा ता. परंडा यांचा व सौदागर विलास ढोंगे, रा. पाचपिंपळा ता. परंडा यांचे असे दोन मोबाईल सह एकुण ३,२५,००० किंमतीची माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-श्रीराम गरड यांनी दि.२५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### २९९ कारवाया करुन २,१६,३५० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२५ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २९९ कारवाया करुन २,१६,३५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव येथे भव्य जिल्हास्तरीय सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत



धाराशिव-(प्रतिनिधी)-मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने एक हात मदतीचा उपक्रमांतर्गत धाराशिव येथे मोफत जिल्हास्तरीय (बिगरहुंडा) सामुदायिक विवाह सोहळ्याचे रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मैदानावर सायंकाळी ६.२५ वाजता हा सोहळा होणार असून इच्छुक वधु-वराच्या पालकांनी १५ जानेवारी २०२६ पर्यंत नावनोंदणी करावी, असे समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी कळविले आहे.

राज्याचे माजी मंत्री तथा परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे आमदार प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या सौजन्याने हा विवाह सोहळा पार पडत आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यात वधु-वरांना मणी मंगळसूत्र, जोडवे, दिवाण, वधु-वरांचे वस्त्र, रूकवत देण्यात येणार असून वऱ्हाडी मंडळींच्या भोजनाचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे.

विवाह नोंदणीसाठी बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग दांपत्य अथवा कुटुंबीयांकडून झालेला नसावा. त्यासाठी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे. जन्म तारखेचा पुरावा म्हणून जन्म नोंदणी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत किंवा जन्माचा स्थानिक प्राधिकार्याने दिलेला दाखला किंवा वैद्यकीय अधिकार्याचे वयाबाबतचे प्रमाणपत्र बंधनकारक आहे. अर्जासोबत वधु-वराचा फोटो सादर करावा.

नोंदणीसाठी बळवंत घोगरे (९४२३३४३४२०४२), सुधीर देशमुख (९४०३६९६५८९), बालाजी झेंडे (९२८४२६५१४२), महेश



राऊत (७४९८२९४००५ / ८००७१३४४४४) यांच्याशी तसेच अधिक माहितीसाठी हॉटेल रोमा पॅलेस महावितरण कार्यालयासमोर धाराशिव येथे संपर्क साधावा. जास्तीत जास्त गरजू व इच्छुक वधु-वरांच्या पालकांनी सामुदायिक विवाह सोहळ्याचा लाभ घ्यावा. असेही मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे यांनी कळविले आहे.

## संत गाडगेबाबा आश्रम शाळेत माने आणि चिलवंते यांचा सत्कार तर हाके यांना निरोप



धाराशिव (प्रतिनिधी)- मंगळूर / धाराशिव- येथील आश्रम शाळेत समस्त बीट मध्ये सर्व आस्थापनांच्या शाळांकडून सोलापूर महानगरपालिका प्रशासन अधिकारी श्री माने आणि वर्धा येथील उपशिक्षणाधिकारी श्री चिलवंते या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

येवती येथील केंद्रप्रमुख श्री हाके यांच्या सेवा गौरव समारंभ निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी श्री हाके ,श्री चिलवंते आणि श्री माने या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावत गेला. असे उद्गार माजी मंत्री प्रा. डॉ.लक्ष्मणराव ढोबळे यांनी काढले , ते पुढे म्हणाले की , शिक्षण क्षेत्राचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांची अत्यंत गरज आहे.

या कार्यक्रमासाठी मंगरूळ बीट मधील सर्व शिक्षक श्री काळे श्री वाले मुख्याध्यापक श्री ईश्वर क्षीरसागर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक श्री ईश्वर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आश्रम शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पेट्रोल पंप ते अष्टविनायक चौक डीपी रोडचा शुभारंभ



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव येथील प्रभाग चार मध्ये आनंदनगर पोलीस स्टेशन समोरील पेट्रोल पंप ते अष्टविनायक चौक हा तेथील जनतेसाठी अतिशय महत्त्वाचा व सोयीस्कर असलेल्या रोडच्या कामाचा शुभारंभ दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी नगराध्यक्षपदी विराजमान होताच तातडीने कामाला लागलेल्या भाजपच्या नगराध्यक्ष सौ. नेहा राहुल काकडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

नगररत्थोनच्या १४७ कोटी रुपयांच्या अंतर्गत असलेल्या निधीतून सदर रोड चे काम उत्कृष्टरित्या होणार असून, धाराशिव शहरातील रस्ते कामांना देण्यात आलेली तात्पुरती स्थगिती रद्द झाल्याने शहरातील ५९ रस्त्यांची कामे आता युद्धपातळीवर होणार आहेत.

धाराशिव शहरातील खराब रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आदरणीय आमदार राणादादांच्या प्रयत्नाने मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब व उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांनी नगरोत्थान योजनेतून शहरातील रस्ते दुरुस्तीसाठी तब्बल ११७ कोटींचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून शहरातील ५९ रस्ते व नाल्यांची कामे करण्यात येणार असून, नगरपरिषद निवडणुकीनंतर लगेच कामाला सुरुवात करण्यात आली असून, औपचारिक शुभारंभ करण्यात आला आहे.

यावेळी नूतन नगराध्यक्षा सौ.नेहाताई काकडे, श्री.अमित शिंदे, यांच्यासह प्रभागातील नगरसेवक श्री.अभिजित काकडे, सौ. राणीताई दाजी पवार, गणेश घोडके, सनी पवार यांच्यासह नगर परिषदेतील मा.नगरसेवक, चंद्रकांत काकडे, नितीन काकडे, भाऊसाहेब कोळी, डॉ.शिंदे, डॉ.माने व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व या भागातील नागरिक उपस्थित होते.

याबाबत भाजपचे यशस्वी नगरसेवक खास लक्ष ठेवून या सोबतच येतील नियोजित पद्धतीने कामाला सुरुवात करत असल्याने जनतेतून त्यांच्या प्रति सद् भावना निर्माण झालेली आहे.

## जळकोट येथे गणेश सोनटक्के मित्रपरिवारच्यावतीने नळदुर्गचे नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील गणेशराव सोनटक्के मित्र परिवाराच्या वतीने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये विजयी झालेल्या नळदुर्ग येथील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष व नगरसेवकांचा जळकोट येथे गणेश सोनटक्के मित्रपरिवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नगराध्यक्षपदी निवडून आलेल्या बसवराज आप्पा धरणे यांनी बलाढ्य उमेदवारांना धूळ चारत ४३३१ मते मिळत दणदणीत व निर्णायक विजय मिळवत नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नगरसेवक नय्यरपाशा जहागीरदार, दत्तात्रय दासकर, रिझवान काझी, शशिकांत पुदाले, तानाजी जाधव, सुमनताई ठाकूर, क्षमा बाई राठोड , राणीताई सुरवसे, मीनाक्षीताई काळे, किशोर नळदुर्गकर व माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश दादा सोनटक्के, भाजपाचे विलास राठोड, दत्ताभाऊ राजमाने, सभापती आशिष सोनटक्के, संजय अंगुले, हनुमंत अंगुले, पत्रकार अरुण लोखंडे, विजय पिसे, मंगेश सुरवसे,बाळासाहेब पाटील, तमनप्पा माळगे, नागनाथ किलजे, सय्यद तांबोळी, संतोष वाघमारे, सदाशिव हासुरे, ज्ञानेश्वर साखरे, प्रवीण पाटील, परमेश्वर मडोळे, तम्मा कुंभार आदी भाजपाचे जळकोट व परिसरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाण्याची ओढ

एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाण्याची जी चढाओढ दिसून येत आहे ही निवडणुकापुर्व होतच असते. पुर्वी प्रमाण कमी होते आता वाढले आहे. नाराज होणाऱ्याचे प्रमाण वाढल्याचा हा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे एका पक्षातून दुसऱ्यापक्षात जात आहेत. त्यापेक्षा जो पक्षा सत्तेत आहे त्या पक्षात जाण्याची स्पर्धा अधिक दिसून येते. मुळात जे निष्ठावंताबरोबर निस्वार्थी आहेत ते पक्ष बदलणारे नाहीत किंवा बदलत नसतात. जे सतत पक्ष बदलत असतात ते आपल्याला उमेदवारी मिळावी, आपल्याहाती सत्ता राहावी असे प्रयत्नवादी असतात. त्यामुळे पक्ष बदलुंची संख्या वाढत आहे. महानगरपालिकेची निवडणुक जाहिर झाली, यात अनेक ईच्छुकांना उमेदवारी मिळली नाही ते ईच्छुक सत्ताधारी पक्षात जात आहेत. अशा व्यक्तीला जनतेनी रोखले पाहिजे. जनता बिचारी गोड बोलले की, भाळते व पाच वर्ष विसरूनही जाते की आपले सेवक आहेत म्हणून? त्यामुळे सध्याला मोठ्या प्रमाणात एका पक्षातून दुसऱ्यापक्षात जाण्याची चढाओढ दिसून येत आहे. नुकत्याच नगरपरिषद व नगरपंचायतच्या निवडणुका निकाल जाहिर झाला. यात अशी काही मंडळी होती की, जी पुर्वी इतर पक्षात होती. काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षातून भाजपामध्ये आलेली मंडळींनी नगरपालिकेत बहुमत मिळाले आहे. या बाबत अंदाज घेतला तर ते पुर्वी पासून जनतेत मिसळणारे होते. त्यांचा अगोदरच दबदबा होता. तरी भिती पोटी सत्ताधारीपक्षात प्रवेश घेऊन निवडणुका लढल्या, त्यामुळे राज्यात भाजपा हा सर्वाधिक नगरपरिषदा ताब्यात ठेवणारा पक्ष ठरला आहे. त्यामुळे नगरपरिषदा असोत किंवा महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या निवडणुका असोत. आपआपल्या वार्डात लोकप्रियता असली पाहिजे. पक्ष निष्ठता असली पाहिजे. आलिकडे अनेक वर्ष पक्षासाठी प्रामाणिक राहुन सुद्धा नवीन आलेल्यांना उमेदवारी दिली जाते हा प्रामाणिक कार्यकत्याचा अपमान आहे. मुळात पुर्वी पक्ष वाढीसाठी काम करणाऱ्यांना महत्वाची पदे दिली जात होती. आता तसे नाही तो कायम सेवा करणाराच कार्यकर्ताच राहीला पाहिजे. अशी मानसिकता बनली आहे. मुळात जे पक्ष बदलत आहेत त्यापैकी काही स्वकर्तृवावरचे नेते आहेत. बरेच जनतेसाठी नाही तर स्वस्वार्थासाठी पक्ष बदलत आहेत. काहींना तर पक्षाने भले मोठे केले तरी थोड्याशी नाराजी झाली की पक्ष बदलत आहेत. जनता सुद्धा स्विकारत आहे. हे योग्य नाही. पक्षासाठी प्रामाणिक राहात नसतील तर ते जनतेसाठी तरी प्रामाणिक राहातील का? या बाबीचा विचार केला पाहिजे. काम करीत असलेल्या पक्षाने उमेदवारी नाकारली तर दुसऱ्यापक्षा जाण्याची तयारी दिसून येते. पक्ष बदलताना किती नागरिक आपल्या पाठीशी आहेत याचा विचार केला पाहिजे. बऱ्याच वेळा. अमुक दमदार नेत्याने पक्ष बदलला. अशा नेत्याच्या पाठिशी घरातील मंडळी नसतात ही वस्तूस्थिती दिसून येते. त्यामुळे पक्ष बदलणाऱ्या जनतेनीच धडा शिकविण्याची हीच वेळ आली आहे. राज्यात अनेक वेळा पक्ष बदलणारे हे स्वबळावर नगरपरिषदा व नगरपंचायत ताब्यात घेतल्या आहेत. पक्षावर नव्हे. मुळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ह्या लोक किंवा विधानसभेसारख्या नसतात, त्या स्थानिक समस्याचा विचार यावेळी केला जातो. वार्डातील व्यक्ती असल्याने सहज ग्राहणी सांगात येतात. विधान किंवा लोकसभेत वेगळे! एक तर मोठा मतदार संघ असतो. आमदार किंवा खासदारांना शोधायाचे कोठे? त्यात त्यांना मंत्रीपद मिळाले तर भेट पाच वर्षांनी भेट होती ही एक साधारण वस्तूस्थिती आहे. त्यामुळे आपल्या वार्डातील प्रामाणिक व्यक्तीच नगरसेवक म्हणून निवडला पाहिजे. पहिल्यांदा जे सत्ता बदलू आहेत त्यांना मोठी अद्दल घडविली पाहिजे. आहे तेथेच बसविले पाहिजे. बऱ्याचवेळा मोठा मतदार पाठीशी नसताना दमदार नेत्यांचे पक्षांतर झाले असे म्हटले जाते. मुळात दमदार कोणाला म्हणावे, याचा विचार झाला पाहिजे. महानगरपालिकेची निवडणुक प्रक्रिया चालू आहे. आता तर दररोज या पक्षातून त्या पक्षात जाण्याची स्पर्धाच सुरु आहे. पक्षातील निष्ठावंत नाराज होतील याचा विचार केला जात नाही. प्रवेश घेताना तो कसा आहे, याचे भान ठेवले जात नाही. हे योग्य नाही. राज्यात निवडणुका आल्या की, पक्षांतर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. पक्षांतर करावे ते करताना स्वस्वार्थासाठी नाही तर जनतेनी यासाठी तसा प्रयत्न केला पाहिजे. जनतेला सुद्धा काही वेळा आपला नेता या पक्षात होता, आता या पक्षात गेल्याचे कळते. असे कार्यकर्ते पाहावयास मिळत आहेत. पक्षांतर पुर्वी होत होते मात्र प्रमाण कमी होते. आता प्रमाण वाढते आहे व जनताही या बाबीला महत्त्व कमी देत आहे. त्यामुळे अधिक या बाबीला महत्त्व न देता जनतेनी आपल्या भागाचा विकास करणारा व सहज भेटणारा असाच उमेदवार निवडला पाहिजे. पक्ष बदलूंना तर कदापी साथ देऊ नये. पक्ष बदलणारे त्या पक्षात मोठे झाले त्यांच्याशी प्रमाणिक राहीले नाहीत तर मग आगामी काळात निष्ठावंत कसे राहातील. याचा विचार मतदरांनी केला पाहिजे. काही वेळा भ्रष्ट व्यक्ती चांगल्या पक्षात जो तो निष्कलंकीत होतो हे काय गणित आहे? भ्रष्टाचारी चुकीचे काम करणाऱ्यास पक्षात घेतले जाते हेही चुकीचे आहे. त्यामुळे पक्ष प्रमुखांनी आता काही विचार केला पाहिजे. थोडेच कार्यकर्ते राहावेत मात्र प्रामाणिक तसेच निष्ठावंत राहावेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात वरिष्ठ नेत्यांनी विचार केला पाहिजे. सध्याला इन्कमिंग चालू आहे. तो कसा आहे. किती जनतेचे पाठबळ आहे याचा विचार केला जात नाही. तसा विचार केला तर मुळ भाजपाचे कमी परवाच्या निवडणुकीत निवडूण आले आहेत जे आयते इतरपक्षातून आले तेच अधिक प्रमाणात विजयी झाल्याने पक्ष एकनंबरवर ठरला आहे. त्यामुळे जनतेची विचारपुर्वक निर्णय घेतला पाहिजे. जनतेनी उमेदवार कसा आहे. तो निष्ठावंत आहे का? त्याची मागील पार्श्वभूमी कसी आहे याचा विचार केला पाहिजे. मतदार हा अविचाराने वागत असल्याने पक्ष बदलणाऱ्यांची संख्येत वाढ होत आहे. हे योग्य नाही. या बाबत चिंतन झाले पाहिजे. तरच चांगले सेवक निवडले जातील. जनतेशी प्रामाणिक राहातील. विकासाची कामे होतील. सर्वात भ्रष्टाचार मुक्ततेकडे वाटचाल दिसून येऊ शकेल.

# निसर्गाच्या संहारावर विकासाच्या वाटा.... निसर्ग रक्षणासाठी शास्वत पर्यायांची गरज

आज एकविसाव्या शतकात भारत विकासाच्या वाटेवर वेगाने पुढे जात आहे, असे आपण मानतो. औद्योगिकीकरण, रस्ते, शहरांचे विस्तारीकरण, धार्मिक सोयी, पर्यटन प्रकल्प हे सर्व ''विकास'' या एका शब्दाखाली गुंडाळले जात आहेत. पण याला खऱ्या अर्थाने विकास म्हणता येणार नाही.कारण याला शास्वततेची जोड नाही. आज अरावली पर्वतरांगांची ओळख पुसली जात आहे. मुंबईतील किनारपट्टी वाचवणारी, समुद्राच्या लाटापासून शहराचे संरक्षण करणारी कांदळवने कोस्टल रोडसाठी तोडण्याचा निर्णय हल्लीच घेण्यात आला. कुंभमेळ्यासारख्या पवित्र धार्मिक सोहळ्याच्या नावाखाली तपोवनातील वृक्षतोड करण्याचे निर्णय घेतले गेले. दुर्दैव म्हणजे असे हे निर्णय केवळ सरकारच नाही तर न्यायालयांच्या परवानगीने घेतले जात आहेत.मग प्रश्न पडतो पर्यावरण, शाश्वतता आणि भावी पिढ्यांचा विचार कुठे आहे?याच्या उदाहरणादाखल नुकताच अरावली पर्वतरांगासाठी न्यायालयाने दिलेला निर्णय... अरावली केवळ डोंगर नाही, तर उत्तरी राज्यांची ६७० किलो मीटर लांबीची जीवनरेषा आहे. गुजरातपासून दिल्लीपर्यंत पसरलेली अरावली पर्वतरांग ही केवळ भूगोलाची रचना नाही तर जैवविविधता आणि इतिहास संरक्षित ठेवणारी नैसर्गिक संरचना आहे. ती उत्तर भारतातील भूजलसाठा, हवामान संतुलन आणि वाळवंटीकरण रोखणारी नैसर्गिक भिंत आहे अनेक प्रकारच्या प्राण्यांचे अधिवास आहे.तिचे पुनर्निर्धारण करून, खाणकाम व बांधकामासाठी खुले करणे म्हणजे नैसर्गिक सीमांना ओलांडून भविष्यातील आपत्तींना आमंत्रित करणे होय.

दूसरे उदाहरण म्हणजे, मुंबईसारख्या सागरी किनारपट्टीवरच्या महानगराच्या विकासासाठी कांदळवने नष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला कांदळवने पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत, कारण ती किनारी भागांची धूप थांबवतात, वादळांपासून संरक्षण देतात, माशांसाठी प्रजननस्थळ बनतात, जैवविविधता टिकवतात आणि कार्बन शोषून हवामान बदलाचा सामना करण्यास मदत करतात, ज्यामुळे किनारी परिसंस्थेचे रक्षण होते. कांदळवने ही सागरी किनारपट्टीची नैसर्गिक ढाल आहे. ती समुद्राची पातळी वाढणे, चक्रीवादळे, त्सुनामी, पूर यांचा परिणाम कमी करतात. कांदळवने ही केवळ झाडे नसून ती किनारपट्टीचे शिलेदार आहेत, जे पर्यावरण आणि मानवी जीवन दोन्हीसाठी आवश्यक आहेत आणि आज काही किलोमीटरचा रस्ता बांधण्यासाठी हजारो वर्षांत तयार झालेली परिसंस्था नष्ट करण्याचा आततायी निर्णय घेणे म्हणजे विकास नव्हे, तर आत्मघातकी धोरण आहे.मागील काही काळापासून नेहमी धर्म विरुद्ध निसर्ग असा विरोधभास का निर्माण होतो आहे? कोणताच धर्म निसर्गाच्या नाशाचे समर्थन करत नाही... निसर्ग जपणे हाच खरा धर्म नाही का? पंचमहाभूतांचे अस्तित्व ईश्वरीय नाही का? हिंदू धर्मातील पवित्र मानला जाणारा कुंभमेळा हा आध्यात्मिकतेचा, शुद्धतेचा आणि संयमाचा उत्सव आहे. मग त्यासाठी हजारो झाडे तोडणे, नदीकाठ उद्ध्वस्त करणे हे कोणत्या धर्मात बसते? हा ईश्वराचा अपमान नाही का?

मानवी जीवनात शिस्त स्थापन करणारी आपली न्यायालये ही संविधानाची आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांची रक्षक आहेत. स्वच्छ हवा, पाणी आणि सुरक्षित पर्यावरण हा देखील प्रत्येक जीवन जगणाऱ्याचा मूलभूत हक्क आहे. मग हा हक्क बळकावण्याचा अधिकार मानवाला कोणी दिला? इतर जीवसृष्टीसाठी मानवाने काही कर्तव्यांचे पालन करायला हवे. मग पर्यावरणविरोधी प्रकल्पांना परवानगी देताना या जीवसृष्टीचा विचार का केला जात नाही... ''टिकाऊ पर्याय'', ''पर्यावरणीय भरपाई'' किंवा ''पर्यायी जागा'' यांचा आग्रह का धरला जात नाही? खरंच शाश्वत निर्णय शक्य नाहीत का?

हो, नक्कीच शक्य आहेत. रस्ते शास्वत पर्यायाने उभारता येऊ शकतात, तपोवनातील झाडे वाचवून कुंभमेळ्याचे नियोजन करता येते, या सारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी पर्यायी जागा विकसित करता येतात. फक्त इच्छाशक्ती आणि दूरदृष्टीची गरज आहे.

आज आपण गप्प बसलो, तर उद्या उत्तर द्यावे लागेल. आज असंवेदनशीलता दाखवली तर उद्या पाण्याची टंचाई, उष्णतेच्या लाटा, पूर आणि आरोग्याच्या समस्या आपल्याला भेडसावतील आणि भावी पिढी आपल्याला यासाठी जाब विचारतील. तेव्हा दोष देण्यासाठी सरकार, न्यायालय किंवा व्यवस्था पुरेशी ठरणार नाही कारण समाज म्हणून आज आपण मौन पाळून यासाठी तेवढेच जबाबदार असणार आहोत. विकास हवा, पण निसर्गाचा बळी देऊन नव्हे. धर्म हवा, पण पर्यावरण उद्ध्वस्त करून नव्हे. निर्णय घ्यायचे असतील, तर ते भावी पिढ्यांचा विचार करून घ्यायला हवेत. आज गरज आहे ती शाश्वत, संवेदनशील आणि जबाबदार निर्णयांची.

कारण निसर्ग नष्ट झाला, तर कोणताही विकास टिकणार नाही. थोडक्यात काय तर जैवविविधता आणि निसर्गाचे संवर्धन करुन विकासाच्या वाटेवर चालणे काळाची गरज आहे.



– डॉ.दीप्ती ढेरे–काळे
सहाय्यक प्राध्यापक
सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

# शिक्षण महर्षी तथा कृषीरत्न डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख



भारताच्या जडणघडणीत ज्या काही मोजक्या युगपुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले,त्यामध्ये डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.दि.२७ डिसेंबर रोजी या महान विभूतीची जयंती आहे. केवळ विदर्भाचेच नव्हे,तर संपूर्ण भारताचे सुपुत्र असलेले डॉ.पंजाबराव देशमुख हे एक द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ,सामाजिक क्रांतिकारक आणि भारताचे पहिले कृषी मंत्री होते.शेती आणि शिक्षण या दोन क्षेत्रांत त्यांनी केलेली क्रांती आजही समाजाला दिशा देण्याचे काम करत आहे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे व्रत अंगीकारून त्यांनी दीनदुबळ्यांच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित केले.

डॉ. पंजाबराव देशमुख, ज्यांना प्रेमाने 'भाऊसाहेब' म्हटले जाते, त्यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या छोट्याशा गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला.त्यांच्या वडिलांचे नाव शामराव आणि आईचे नाव राधाबाई होते. बालपण अत्यंत गरिबीत गेल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्यांना लहानपणापासूनच उमजले होते.प्राथमिक शिक्षण पापळ येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण अमरावती आणि उच्च शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात घेतले. शिक्षणाची ओढ त्यांना सातासमुद्रापार घेऊन गेली. त्यांनी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातून एम.ए. केले आणि पुढे 'वैदिक वाङ्मयातील धर्माचा उगम आणि विकास' या विषयावर पीएच.डी. मिळवून ते 'डॉक्टर' झाले. ते बॅरिस्टरही झाले.एक शेतकरी कुटुंबातील मुलगा त्या काळी एवढे उच्च शिक्षण घेतो, ही बाबच अत्यंत प्रेरणादायी होती.पण हे ज्ञान केवळ स्वतःसाठी न वापरता समाजासाठी वापरण्याचा दृढ निश्चय त्यांनी केला होता.

डॉ.पंजाबराव देशमुखांवर महात्मा जोतीराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा, तसेच सत्यशोधक चळवळीचा मोठा पगडा होता.जातीभेद, अस्पृश्यता आणि अज्ञान यांमुळे समाज मागे राहिला आहे, हे त्यांनी ओळखले होते. १९२७ मध्ये त्यांनी अमरावती येथील अंबादेवीचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून मोठा सत्याग्रह केला. हा लढा केवळ प्रवेशाचा नव्हता, तर मानवी हक्कांचा होता. शेतकरी आणि कष्टकऱ्यांची मुले जोपर्यंत शिकणार नाहीत, तोपर्यंत त्यांचे दारिद्र्य दूर होणार नाही, या विचाराने त्यांना अस्वस्थ केले होते. त्यांनी समाजातील अनिष्ट रूढी–परंपरांविरुद्ध आवाज उठवला आणि विधवा विवाहास प्रोत्साहन दिले.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, हे डॉ.आंबेडकरांचा मंत्र भाऊसाहेबांनी प्रत्यक्ष कृतीत आणले. विदर्भातील ग्रामीण भागातील, शेतकरी आणि खेडुत समाजातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून १९३१–३२ मध्ये त्यांनी 'श्री शिवाजी शिक्षण संस्थे'ची स्थापना केली. आज ही संस्था महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. पण याची सुरुवात अत्यंत कठीण काळात झाली होती. भाऊसाहेबांनी स्वतः च्या पदराला खार लावून आणि लोकांकडून देणग्या गोळा करून शाळा–महाविद्यालये सुरू केली. आज या संस्थेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी आणि कला–वाणिज्य क्षेत्रात प्रगती करत आहेत. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखवणे, हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

डॉ.पंजाबराव देशमुख हे केवळ समाजसुधारकच नव्हते, तर एक अभ्यासू राजकारणीही होते. ते भारताच्या संविधान सभेचे सदस्य होते. भारतीय राज्यघटना तयार करताना, विशेषतः शेतकऱ्यांच्या आणि मागासवर्गीयांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी मोलाची भूमिका बजावली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत काम करताना त्यांनी संविधानात शोषित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी अनेक तरतुदींवर चर्चा केली.स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख भारताचे पहिले कृषी मंत्री झाले. या काळात त्यांनी जे कार्य केले, ते भारताच्या कृषी इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.त्यांच्या कार्यकाळात त्यांनी खालील महत्त्वपूर्ण निर्णय घेतले: १.जपानी भातशेती पद्धत:भारतात तांदळाचे उत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी जपानी भातशेती पद्धतीचा प्रचार आणि प्रसार केला,ज्यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली. २.भारत कृषक समाज:शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांना संघटित करण्यासाठी त्यांनी १९५५ मध्ये 'भारत कृषक समाज' या संघटनेची स्थापना केली. ३.जागतिक कृषी प्रदर्शनः १९५९–६० मध्ये त्यांनी दिल्लीत भव्य जागतिक कृषी प्रदर्शन भरवले. या प्रदर्शनामुळे भारतीय शेतकऱ्यांना जागतिक पातळीवरील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख झाली. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी या प्रदर्शनाला भेट दिली होती,हे भाऊसाहेबांचे मोठे यश होते. ४.कृषी विद्यापीठेः शेतकऱ्यांच्या मुलांनी शेतीचे आधुनिक शिक्षण घ्यावे, यासाठी त्यांनी कृषी विद्यापीठांच्या स्थापनेला चालना दिली.त्यांचे धोरण स्पष्ट होते – जोपर्यंत शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळणार नाही, तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. त्यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठीही विशेष प्रयत्न केले.

भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे पण प्रभावी होते. ते नेहमी खादीचे कपडे घालत. सत्तेच्या उच्च पदावर असूनही त्यांची नाळ नेहमी मातीशी जोडलेली राहिली. त्यांचा एक प्रसिद्ध विचार आहे: भटक्या माणसाला स्थिर करायला शेती आणि स्थिर माणसाला प्रगल्भ करायला शिक्षण हवे. या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण कार्याचे सार सामावलेले आहे. त्यांनी शेतकऱ्यांना केवळ 'अन्नदाता' मानले नाही,तर त्याला सन्मान मिळवून दिला. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून ते चरित्र घडवण्यासाठी आहे,असा त्यांचा आग्रह होता.त्यांनी स्थापन केलेली शिवाजी शिक्षण संस्था आज वटवृक्षाप्रमाणे विस्तारली आहे, जी त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देते.

१० एप्रिल १९६५ रोजी या महामानवाचे निधन झाले, परंतु त्यांचे विचार आजही अमर आहेत. आज जेव्हा आपण शेतकरी आत्महत्या आणि कृषी क्षेत्रातील संकटांबद्दल ऐकतो, तेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची आणि धोरणांची गरज प्रकर्षाने जाणवते.डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ एक व्यक्ती नव्हते,तर ती एक संस्था होती,एक विचार होता.त्यांनी लावलेल्या रोपट्याचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना खरी श्रद्धांजली हीच असेल की, आपण शिक्षणाचे महत्त्व ओळखावे आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे.ज्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी वेचला,त्या कृषी महर्षी तथा शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना विनम्र अभिवादन!



-प्रा.भिसे सौदागर सतीश
श्री.शिवाजी कला,वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय,
दर्यापूर रोड, आकोट जि.अकोला

## घोरण्याची समस्या त्रास देतेय? 'हे' आयुर्वेदिक उपाय लगेच करतील मदत



बहुतांश लोकांना घोरण्याची सवय असते. घोरणे ही एक सामान्य समस्या आहे. आणि बरेच लोक या समस्येने ग्रस्त आहेत. तुमच्या आजूबाजूच्या लोकांना ही समस्या त्रासदायक ठरू शकते. परंतु कधीकधी घोरणाऱ्या व्यक्तीलासुद्धा ती त्रासदायक ठरू शकते. कारण ही समस्या दिसते तितकी सोपी नसते. अनेकदा ती एक जुनाट आजारामुळे असू शकते.

जीवनशैलीतील छोटा–छोटे बदल, जसे की वजन कमी करणे, झोपण्यापूर्वी मद्यपान टाळणे किंवा कुशीवर झोपणे, यामुळे घोरणे थांबण्यास मदत होऊ शकते. आयुर्वेदात घोरणे आणि नाकाच्या समस्यांसाठी अनेक उपाय सांगितले आहेत जे कोणत्याही दुष्परिणामांशिवाय ही समस्या दूर करण्यास मदत करू शकतात. आज आपण घोरण्याच्या समस्येवर असेच काही आयुर्वेदिक उपाय जाणून घेऊया..

गाईचे तूप–

डॉक्टरांच्या मते, सकाळी किंवा रात्री तुमच्या नाकपुड्यात गायीच्या तुपाचे दोन थेंब टाकल्याने तुम्हाला चांगली झोप येते. डोकेदुखी, तणाव, मायग्रेन इत्यादींपासून आराम मिळतो, तुमची रोगप्रतिकारक शक्ती सुधारते, ऍलर्जी कमी होते, स्मरणशक्ती सुधारते आणि मानसिक आरोग्य सुधारते.

झोपण्यापूर्वी तुम्ही तुमच्या नाकपुड्यात गायीच्या तुपाचे दोन थेंब टाकावे. हे २१ दिवस ते तीन महिने करा. यामुळे तुम्हाला चांगली झोप येईल, तुमचे मन शांत होईल, डोकेदुखी कमी होईल आणि महत्वाचे म्हणजे घोरणे कमी होईल.

अनु तेल–

जर तुम्हाला गाईचे तूप वापरायचे नसेल तर तुम्ही अनु तेल वापरून पाहू शकता. हे एक आयुर्वेदिक तेल आहे जे नस्य थेरपीसाठी वापरले जाऊ शकते. परंतु केवळ डॉक्टरांच्या सल्ल्याने ते वापरले पाहिजे.

तुपात तळलेले लसूण–

त्यांनी सांगितले की लसूण घरीही सहज उपलब्ध आहे. लसूणच्या दोन पाकळ्या तुपात भाजून औषध म्हणून घेतल्याने घोरण्यापासून आराम मिळतो.

भाजलेले लवंग–

रात्री झोपण्यापूर्वी भाजलेले लवंग खाल्ल्याने घोरण्याच्या समस्येपासून आराम मिळतो.

कोमट पाणी आणि मध–

घोरण्याच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी कोमट पाण्यात दोन चमचे मध मिसळून हळूहळू प्यायल्यानेही घोरण्यापासून आराम मिळेल.

ऑलिव्ह ऑइल–

ऑलिव्ह ऑइल देखील एक अतिशय प्रभावी उपाय आहे. नाकात दोन थेंब टाकणे किंवा ते तेल टाकून नाकाने वाफ घेणे देखील घोरण्यापासून आराम देऊ शकते.

## हिवाळ्यात रोज कोमट पाणी पिण्याचे आहेत ६ आश्चर्यकारक फायदे



शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी पाणी आवश्यक आहे. ते आपल्या शरीरात ऑक्सिजन वाहून नेण्यास देखील मदत करते. हिवाळा सुरू झाला आहे आणि या हंगामात सर्दी आणि फ्लू सामान्य आहेत आणि शहरांमध्ये राहणारे लोक देखील प्रदूषणाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत, निरोगी राहण्यासाठी तुम्हाला वैयक्तिक काळजी घ्यावी लागेल. कोमट पाणी पिणे ही एक महत्त्वाची मदत असू शकते. चला जाणून घेऊया त्याचा आपल्याला कसा फायदा होतो.

रक्ताभिसरण सुधारते–

हिवाळ्यात कोमट पाणी पिल्याने तुमचे रक्ताभिसरण सुधारू शकते. खरं तर, हिवाळ्यात आपल्या रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. ज्यामुळे उच्च रक्तदाब होऊ शकतो. कोमट पाणी पिल्याने तुमच्या रक्तवाहिन्या आराम मिळतात आणि रक्ताभिसरण सुधारते.

सांधेदुखीपासून आराम–

हिवाळ्यात अनेक लोकांना गुडघेदुखी आणि सांधेदुखीचा त्रास होतो. कोमट पाणी पिल्याने पायात गोळे येणे आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो.

थंडीपासून आराम–

हिवाळ्यात कोमट पाणी पिल्याने शरीरातील आर्द्रता टिकून राहण्यास मदत होते. ते तुमच्या शरीरात लवकर शोषले जाते आणि तुम्हाला ताजेतवाने ठेवते. शिवाय, ते तुमचे शरीर आतून उबदार ठेवते. ज्यामुळे थंडीपासून आराम मिळतो.

मेटाबॉलीज्म सुधारते–

हिवाळ्यात आपला मेटाबॉलीज्म मंदावतो. कारण आपण खूप कमी हालचाली करतो. ज्यामुळे वजनसुद्धा वेगाने वाढते. कोमट पाणी पिल्याने तुमचा मेटाबॉलिज्म वाढतो आणि तुमच्या शरीरातील अतिरिक्त चरबी वितळण्यास मदत होते. ज्यामुळे वजन कमी होण्यास देखील मदत होऊ शकते.

कफपासून आराम–

थंड तापमानामुळे, हिवाळ्यात लोकांना नाक बंद होणे आणि कफचा त्रास होतो. कोमट पाणी पिल्याने या समस्यांपासून आराम मिळू शकतो.

पचनक्रिया सुधारते–

हिवाळ्यात पचन मंदावते, ज्यामुळे अनेकदा बद्धकोष्ठता होते. परंतु कोमट पाणी पिल्याने तुमचे चयापचय वाढते, पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता दूर होते.

# मधुमेहामुळे होणाऱ्या शिरेतील वेदना



अनेकदा मधुमेही न्यूरोपॅथी किंवा रक्ताभिसरणाच्या समस्यांमुळे उद्भवतात, ज्यात पायांच्या नसांना इजा होऊन वेदना, मुंग्या येणे, बधीरपणा येतो, तसेच रक्ताच्या गुठळ्या किंवा सूज हेही कारण असू शकते; यासाठी रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणे, डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि योग्य उपचार करणे आवश्यक आहे.

मधुमेही रुग्णांमध्ये फिब्युला शिरेच्या वेदनांची कारणे:मधुमेही न्यूरोपॅथी -उच्च रक्तातील साखर दीर्घकाळ राहिल्याने शरीरातील नसांना नुकसान पोहोचते, विशेषतः पाय आणि पायांच्या नसांना. यामुळे वेदना, जळजळ, मुंग्या येणे किंवा बधीरपणा जाणवतो, जो फिब्युला शिरेच्या आजूबाजूच्या नसांमध्येही असू शकतो.

परिधीय धमनी रोग-मधुमेहामुळे रक्तवाहिन्या अरुंद होतात, ज्यामुळे पायांना रक्तपुरवठा कमी होतो.यामुळे चालताना किंवा विश्रांती घेताना पायांमध्ये वेदना होऊ शकते, ज्याला मक्लॉडिकेशनफ म्हणतात.

रक्ताच्या गुठळ्या-मधुमेहामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे शिरांमध्ये वेदना आणि सूज येऊ शकते.

स्नायूंचा थकवा आणि ताण:अतिवापर किंवा निर्जलीकरणामुळे स्नायूंच्या क्रॅम्प्स आणि वेदना होऊ शकतात, ज्यामुळे फिब्युला शिरेच्या भागातही वेदना जाणवते.

एडेमा (एवशार - सूज):
मधुमेह किडनीच्या कार्यावर परिणाम करू शकतो, ज्यामुळे पायांमध्ये पाणी साठून सूज येते आणि वेदना होते. लक्षणे-पायांमध्ये तीव्र वेदना किंवा जळजळ.
मुंग्या येणे किंवा बधीरपणा.
पायांना स्पर्श केल्यास संवेदना कमी होणे.
स्नायूंमध्ये क्रॅम्प्स
पायांना सूज येणे.उपचार आणि व्यवस्थापन
रक्तातील साखर नियंत्रण: रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.
डॉक्टरांचा सल्ला: न्यूरोपॅथी किंवा झअऊ साठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घेणे.जीवनशैलीत बदल: संतुलित आहार आणि नियमित व्यायाम.
पायांची काळजी: पायांची नियमित तपासणी करणे, जंतुसंसर्ग टाळणे.फिजिकल थेरपी: स्नायू बळकट करण्यासाठी मदत करू शकते.

# मुलांकडून चांगली वागणूक अपेक्षित असेल, तर त्यांना सन्मानही द्या



काही पालकांकडून ही तक्रार आपण अनेकदा ऐकतो - माझे मूल बिघडत चालले आहे, ऐकत नाही, दिवसेंदिवस उद्धट होत चालले आहे. मोठ्यांशी बोलण्याची शिस्त नाही. अशा प्रकारची तक्रार अनेक पालक करतात. पण, स्वतः कुरघोडी करणे चुकीचे नाही नाही का? तुम्ही तुमच्या मुलाला आदर देता का? हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, तितकाच या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. जाणून घेऊया त्याच्याशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टी.

मुलं ही कच्च्या मातीसारखी असतात. जसे तुम्ही त्यांना आकार द्याल तसे ते तयार होणार. जर तुम्ही लहानपणापासूनच मुलाला आदर दिलात, त्याच्या बोलण्याला प्रेमाने प्रतिसाद दिलात तर तो तुमच्याकडून त्याच गोष्टी शिकेल. मुलांच्या भावनांना, त्यांच्या निर्णयाला जर तुम्ही महत्त्व दिले तर तुमचा बंध तर घट्ट होईलच, पण त्यांचे म्हणणे ऐकले आणि समजले आहे असे त्यांना वाटेल आणि त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही वाढेल.

**मुलांना आदर कसा द्यावा?**

अनेक वेळा पालक आदर या शब्दाचा गैरसमज करतात आणि मुलाचा प्रत्येक हट्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात जे योग्य नाही. विचार करा सार्वजनिक ठिकाणी कोणी तुमच्यावर ओरडले तर तुम्हाला कसे वाटेल? तुमचा अपमान होईल आणि तुमचा अहंकार दुखावला जाईल. पण, अनेक वेळा आपण मुलांच्या बाबतीत असे करतो आणि त्यांच्या भावनांची पर्वा न करता आपण त्यांना शिव्या देतो आणि कधी कधी हात देखील उचलतो. या वर्तनामुळे मुले हट्टी होतात आणि त्याचा त्यांच्यावर खूप वाईट परिणाम होतो हे लक्षात ठेवा. आपण मुलांना खूप ऑर्डर सोडतो. हे आणा, का नाही केलेत इ. मुलांमध्ये कामाची सवय लावणे आवश्यक आहे, परंतु, ऑर्डरने नव्हे तर प्रेमाने. लहानपणापासूनच पालक आपल्या मुलांना चांगल्या सवयी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात. चुकले का सॉरी म्हणायचं, थँक्यू म्हणायचं, सकाळची सुरुवात गुड मॉर्निंगने करायची आणि दिवसाचा शेवट गुड नाईटने करायचा की नाही, हेही महत्त्वाचं आहे. जर तुम्हाला मुलाला काही काम करून घ्यायचे असेल तर ऑर्डर देण्याऐवजी त्यांना विनंती करा किंवा तुमचे शब्द प्रेमाने सांगा.

नकारात्मक गोष्टी करू नका

मुले जन्माला येताच खूप उत्सुक असतात. ही उत्सुकता पूर्ण करण्यासाठी काही वेळा त्यांचे प्रश्न खूप गोंडस आणि मजेदार असतात. पण, आम्ही त्यांना खडसावतो. मुलांची ही जिज्ञासा पूर्ण करणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे आणि याचा जबाबदारीने विचार करून त्यांनी प्रेमाने उत्तर दिले तर मुलांच्या मनातील शंकाही दूर होतील आणि त्यांचा आत्मविश्वासही वाढेल.

मुलांनाही काही निर्णय घेऊ द्या

मुलांना त्यांच्या वयानुसार काही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे महत्त्वाचे आहे. यामुळे त्यांना त्यांचे महत्त्व आणि जबाबदारीही जाणवेल. काही लहान मुलांमध्ये, रात्रीच्या जेवणासाठी काय खावे किंवा कुठे फिरायला जावे यासारखे त्यांचे मत तुम्ही घेऊ शकता. या गोष्टी अगदी लहान वाटत असल्या तरी त्याचा मुलांच्या संगोपनावर खूप खोल आणि सकारात्मक परिणाम होतो.

त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्या

काही चूक झाली तर पालक फक्त मुलाला खडसावतात आणि आपण आपले कर्तव्य केले आहे हे समजून घेतात. मुलाचा दृष्टिकोन समजून घेणे खूप महत्वाचे आहे. त्याने चुकीचे वर्तन का केले हे समजून घेण्याचा प्रयत्न करा. तसेच मुलाला त्याच्या मनातल्या गोष्टी बोलण्याची पूर्ण संधी द्या. प्रत्येकाचे ऐकण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी घरात एक न्याय धोरण पाळले जात असल्याची भावना मुलाला द्या.

# निष्ठावंत कार्यकर्ता आणि फोडाफोडी



राष्ट्रवादी पक्षाशी कायम एकनिष्ठ राहिलेल्या प्रशांत जगताप यांना शरद पवार गटाने अजित पवार गटाबरोबर जाणे पसंत न पडल्याने राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. निष्ठावंत कार्यकर्त्यांची खदखदच यातून व्यक्त झाली.

नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत बालेकिल्ला असलेल्या चंद्रपूरमध्ये भाजपला केवळ दोन जागा राखता आल्याने भाजप नेते सुधीर मुनगंटीवार अस्वस्थ आहेत. भाजपच्या नेत्यांनीच काँग्रेसला ताकद दिली; पण आपली ताकद कमी केली असे वक्तव्य करून त्यांनी राज्यातील भाजप नेतृत्वालाच लक्ष्य केले. मुख्यमंत्रिपदही येते, जाते ते कायमचे नसते असा टोलाही त्यांनी लगावला. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळ अधिवेशनातही एखाद्या विरोधी पक्षाच्या नेत्यासारखी त्यांनी स्व-पक्षावरच आगपाखड केल्याचे पाहायला मिळाले. राज्यातील नेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न हा त्यांच्या निराशेतून आला असावा. आम्ही पक्षासाठी रक्त आटवले फक्त येणार्या पाहुण्यांनी हे घर आपले असल्याचा दावा करू नये एवढेच आपले म्हणणे आहे, अशी सारवासारव मुनगंटीवार यांनी केली आहे.


त्यांची ही भावना चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. पक्षासाठी वर्षानुवर्षे राबलेल्या निष्ठावान कार्यकर्त्यांची उपेक्षा होत असेल, तर त्यांची खदखद कधी ना कधी बाहेर पडणारच. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर पक्ष प्रवेश होत आहेत. विरोधी पक्षातूनच नव्हे, तर महायुतीतील मित्र पक्षाचेही कार्यकर्ते फोडले जात आहेत. बाहेरून होणार्या पक्ष प्रवेशाला निष्ठावंतांचा विरोध असूनही ते केले जात आहे. नाशिकमध्ये ठाकरे यांच्या शिवसेनेतून आलेल्याचे भाजपमध्ये स्वागत केले जात असताना निष्ठावंतांनी मंत्री गिरीश महाजन यांनाच घेराव घातला होता. बाहेरून आलेल्यांना महापालिकेची उमेदवारी दिली जात असून निष्ठावंतांची उपेक्षा होत असल्याची भावना बळावत आहे. त्यातून उघड नाराजीचे प्रदर्शन होत आहे. कार्यकर्त्याला गृहीत धरण्याची ही चूक भविष्यात भाजपसाठी धोकादायक ठरू शकते.

मुळावरच घाव

मुनगंटीवार यांच्या या वक्तव्याकडे केवळ वैयक्तिक नाराजी म्हणून पाहाणे चुकीचे ठरेल. त्यांची वक्तव्ये म्हणजे असंतुष्ट भाजप कार्यकर्त्यांची प्रातिनिधिक भावना म्हणावी लागेल. निष्ठावंत कार्यकर्ते विरुद्ध इतर पक्षातून आयात केलेला आणि पक्षाला विजयी करून देणारा चेहरा यांच्यातील हा संघर्ष आहे. पक्षाच्या या धोरणामुळे पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या कार्यकर्त्यांचा पक्षावरील विश्वास कमी होत आहे. पक्ष आणि कार्यकर्ता यांच्यातील दुरावा वाढत आहे. कोणत्याही पक्षाचा मूळ पाया हा त्या पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता हाच असतो; परंतु अलीकडे भाजपमध्ये प्रवेश म्हणजे विजय अशा प्रकारचा समज वाढू लागल्याने इतर पक्षा-तून घाऊक प्रमाणात भाजपमध्ये प्रवेश होत आहेत. भाजपही फोडाफोडीला खतपाणी घालत आहे. एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील कार्यकर्ते भाजपमध्ये आणण्याचे प्रयत्न झाले, त्यावरून शिवसेनेतून उघड नापसंतीचे सूर उमटले. वर्षानुवर्षे पक्षाचे काम करणार्यांना डावलले जाते. पक्षासाठी तो मेहनत करतो; पण उमेदवारी देताना त्याला डावलून पक्षात नव्याने बाहेरून आलेल्यांना ती दिली जाते, हा एकप्रकारे त्यांच्यावरील अन्यायच ठरतो. भाजपने सध्या विजयक्षम उमेदवार या निकषावरच फोडाफोडीचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. घाऊक पक्षप्रवेश होताना पैसा, जातीय समीकरणे, वैयक्तिक प्रभाव यांनाच प्राधान्य मिळते; मात्र निष्ठा, विचार आणि संघटनेतील योगदान या बाबी गौण मानल्या जातात. यामुळे कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान दुखावला जात आहे. नाराज कार्यकर्त्यांची अस्वस्थता त्याला पक्ष संघटनेत निष्क्रिय होण्यास भाग पाडते. त्याचा परिणाम पक्षासाठी काम मनापासून केले जात नाही. यातून अंतिमतः पक्षाचेच नुकसान होण्याचा धोका अधिक आहे. जिंकण्याची ज्याची क्षमता अधिक त्याला उमेदवारी हाच एकमेव निकष ठरला तर निष्ठा, विचारसरणी आणि संघटनात्मक शिस्त याचे काय? विजयाच्या उन्मादात निष्ठावंतांची मुळेच पक्षातून उखडली जात असतील, तर त्यातून अंतिमतः पक्षा-चेच नुकसान होण्याची शक्यता अधिक याचे भानही नेतृत्वाने ठेवण्याची आवश्यकता आहे.

## डॉक्टर टीप्स

### सेक्स लाईफ सुधारण्यासाठी आहाराचा कितपत उपयोग होतो?



तसंच चेरी, ब्लॅकबेरी, ब्लॅककरंट, क्रॅनबेरी, रसबेरी, द्राक्ष, ऑबरगेन आणि लाल पत्ताकोबी यांच्यात आढळणाऱ्या अँथोसायनिनचा उपयोग होऊ शकतो.
ॲफ्रोडिजियाक म्हणजे काय?
अफ्रोडाईट या नावावरून अफ्रोडिजियाक हे नाव प्रचलित झालं. त्यांची विभागणी तीन भागात होऊ शकते. ते म्हणजे, कामेच्छा जागृत करणारे, संभोगक्षम आणि लैंगिक सुखकारक. पण खरंच अफ्रोडिजियाकमुळे लैंगिक क्षमतेत वाढ होते की नाही हे वैज्ञानिकरीत्या सिद्ध होऊ शकलेलं नाही.लैंगिक आरोग्याचे तज्ज्ञ असलेले डॉ. क्रिचमन सांगतात, अफ्रोडिजियाक आहार घेणाऱ्या व्यक्तींना फक्त ते काम करत असतील असा विश्वास असतो, म्हणून ते हा आहार घेतात. जर एखादी गोष्ट तुमच्यासाठी उपयोगाची असेल, तर तिचा कशाप्रकारे उपयोग आहे याला महत्त्व नसते.काही पदार्थ आरोग्यदायी आहेत. पण हा आहार घेतल्यानंतर शरी-रावर त्याचे परिणाम कशाप्रकारे होतात, याची तपासणी करणंही गरजेचं आहे.

## विनोद




आईने सोनूला विचारले, 'तू इथे ठेवलेली बिस्किटे खाल्लीस का?' सोनू म्हणाला, 'मी एकाला हात लावला नाही.' तेव्हा आई म्हणाली, 'इथे तर एकच शिल्लक आहे.' 'त्यालाच मी हात लावला नाही.' सोनू म्हणाला.

## संदेश

FARHAN & RANCHO
scooty pe Ghumne gaye..
Achanak RANCHO Urr gaya
Q?
Qki

Behti Hawa sa
tha w0
Urti Patang
sa tha W0
Ab Msg Padhna Band Karo Or
RANCHO kahan gaya usey DHUNDO...

## सुविचार




विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.
**- विनोबा भावे**

**संस्कृत सुभाषित**

**अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातय: सुहृदो द्विजा :**
**अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ७२, श्लोक २० महाभारत)अर्थ :** ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय-बैलाचे खाद्य
५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिंदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर
४५. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम, ७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव
७९. दागदागिने
८०. रड्या मनुष्य

### उभे शब्द

१. सहस्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवाड्याचा दिवस
१५. अखेरीस
१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दु:ख, खेद, सल
७८. लुसलुशीत

### आडवे उत्तरे

१.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

### उभे उत्तरे

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ




# तो सेटवर उशिरा पोहोचायाचा....

## बॅटल ऑफ गलवानमधील सहकलाकार सलमान खानविषयी हे काय बोलली?



साजरा करत आहे. त्याला इंडस्ट्रीत येऊन आता ३७वर्षे झाली आहेत. पण या मोठ्या प्रवासात, त्याच्या सहकलाकारांनी सेटवर उशिरा पोहोचल्याबद्दल त्याच्यावर अनेक वेळा टीका केली आहे.

सेटवर उशिरा पोहोचायाचा.... 'बॅटल ऑफ गलवान' मधील सहकलाकार सलमान खानविषयी हे काय बोलली?

३७ वर्षे बॉलिवूडमध्ये काम करणारा सलमान खान आज त्याचा ६० वा वाढदिवस साजरा करत आहे. अनेक सुपरहिट चित्रपट त्याने हिंदी चित्रपटसृष्टीला दिले. भाईजान म्हणून प्रसिद्ध असलेल्या सलमान खानवर अनेकदा सेटवर उशिरा येण्यावरून त्याच्या सहकलाकारांनी बोललं आहे. याच मुद्द्यावर आता त्यांच्या आगामी चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान' मधील सहकलाकार चित्रांगदा सिंह यांनी आपला अनुभव मोकळेपणाने सांगितला आहे.१९८८ मध्ये 'बीवी हो तो ऐसी' या चित्रपटातून करिअरची सुरुवात करणाऱ्या सलमान खानने 'मैंने प्यार किया' नंतर थेट स्टारडम मिळवले. आज ते इंडस्ट्रीतील मोठ्या नावांपैकी एक आहेत. मात्र, काही सहकलाकारांनी वेळेच्या बाबतीत त्यांच्या शिस्तीवर प्रश्न उपस्थित केले होते. या पार्श्वभूमीवर 'बॅटल ऑफ गलवान'*मधील अभिनेत्री चित्रांगदा सिंह यांनी दिलेले वक्तव्य लक्ष वेधून घेत आहे.


काय म्हणाली चित्रांगदा सिंह?

'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटात सलमान सोबत चित्रांगदा सिंह आहे. तिने काही गोष्टींचा खुलासा केला आहे. ती म्हणाली, सलमानबद्दल अशा गोष्टी मीही आधी ऐकल्या होत्या. पण माझ्या अनुभवात ते एकदाही सेटवर उशिरा आले नाहीत. उलट, काही भावनिक आणि महत्त्वाच्या सीनसाठी ते सकाळी १०:३० वाजताच सेटवर उपस्थित असायचे, जरी त्या सीनमध्ये त्यांचा सहभाग नसला तरीही. ती पुढे म्हणाली की सलमान सलग अनेक दिवस वेळेवर येत होते आणि संपूर्ण टीमच्या कामात रस घेत होते. ते फक्त अभिनयापुरते मर्यादित राहत नाहीत, तर प्रत्येक सीन अधिक नैसर्गिक कसा होईल यावर सतत विचार करत असतात, असेही त्यांनी सांगितले.




कसा होता चित्रांगदाचा अनुभव?

चित्रांगदा पुढे म्हणाली, प्रत्येकाचा अनुभव वेगळा असू शकतो. मी फक्त माझ्या अनुभवावरून बोलत आहे. सलमान आपल्या कामाशी अत्यंत प्रामाणिक आहेत. सीन बनावटी वाटू नये यासाठी ते खूप मेहनत घेतात. त्यांना काम करताना पाहणे खरोखरच प्रेरणादायी आहे. तिने हेही सांगितले की सलमान प्रत्येक सीननंतर काय शूट झाले आहे हे जाणून घेण्यासाठी बसून संपूर्ण प्रक्रिया पाहत असायचे. माझ्यासाठी हे सगळं खूपच आश्चर्यकारक होतं, कारण प्रत्यक्षात जे पाहिलं ते ऐकलेल्या गोष्टींपेक्षा पूर्ण वेगळं होतं, असेही ती म्हणाली. 'बॅटल ऑफ गलवान'चा टीझर आज प्रदर्शित सलमान खानच्या ६०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने आज, २७ डिसेंबर रोजी 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला जाणार आहे. या चित्रपटाबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून, सलमानच्या प्रोफेशनलिझमविषयी आलेल्या या प्रतिक्रियांमुळे चर्चेला आणखी उधाण आले आहे.



## सलमान खानचा दिलदारपणा, या व्यक्तींसोबत साजरा केला वाढदिवस

बॉलिवूड अभिनेता सलमान खानने त्याचा ६० वा वाढदिवस पापाराझींसोबत साजरा केला आहे. याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

सलमान खानचा दिलदारपणा, या व्यक्तींसोबत साजरा केला वाढदिवस, कोण-कोण उपस्थित?

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानने २७ डिसेंबर रोजी आपला ६० वा वाढदिवस साजरा केला. या खास दिवशी त्याच्या साध्या पण मनमिळावू अंदाजाने पुन्हा एकदा चाहत्यांची मनं जिंकली. भाईजान पनवेल येथील आपल्या फार्महाऊसच्या बाहेर आला आणि तिथे जमलेल्या पापाराझींसोबतच वाढदिवस साजरा केला. त्याने पापाराझींसोबत केक कापला आणि फोटो काढण्याआधी स्वतः त्यांना केकही भरवला.

हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून सलमानच्या साधेपणाचं सर्वत्र कौतुक केलं जात आहे.

सलमान खानने आपली वाढदिवस पार्टी खासगी ठेवली होती. या सेलिब्रेशनमध्ये फक्त त्याचे कुटुंबीय आणि अतिशय जवळचे मित्रमैत्रिणी उपस्थित होते. या वेळी सलमानचं संपूर्ण कुटुंब एकत्र दिसून आलं. बॉलिवूडमधील काही मोठे कलाकारही या पार्टीला हजेरी लावताना दिसले. यामध्ये आदित्य रॉय कपूर, रकुल प्रीत सिंह आणि हुमा कुरैशी यांचा समावेश होता. अरबाज खान आपल्या पत्नी शूरा खानसोबत फार्महाऊसवर पोहोचला तर त्यांचा मुलगा अरहानही बाहेर स्पॉट झाला. सलमानची बहीण अर्पिता खान हिने पती आयुष शर्मासोबत या आनंदाच्या क्षणात सहभाग घेतला.

या सेलिब्रेशनची रौनक वाढवण्यासाठी अभिनेत्री तबूही उपस्थित होती. याशिवाय भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार एम. एस. धोनी पत्नी साक्षी आणि मुलगी जीवासोबत या खास सोहळ्यात सहभागी झाला. सलमानचे वडील सलीम खान आणि आई सलमा खान यांच्या उपस्थितीमुळे हा वाढदिवसाचा सोहळा पूर्णपणे कुटुंबीय वातावरणात पार पडला.


वाढदिवसाच्या दिवशी करणार मोठी घोषणा

दरम्यान, वाढदिवसाच्या आनंदातच चाहत्यांना सलमान खानच्या आगामी चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान'ची उत्सुकता लागून राहिली आहे. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे की या खास दिवशी भाईजान आपल्या चाहत्यांना या चित्रपटासंदर्भात एखादं मोठं सरप्राईज देईल.हिंदुस्तान टाइम्सशी बोलताना एका सूत्राने सांगितले की, 'सलमान खान २७ डिसेंबर रोजी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने चाहत्यांना 'बॅटल ऑफ गलवान'शी संबंधित एक मोठी भेट देणार आहे. दुपारी २ ते ४ वाजेदरम्यान चित्रपटाची खास झलक किंवा टीझर रिलीज होण्याची शक्यता आहे.' या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेत्री चित्रांगदा सिंहही महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. सलमानच्या ६० व्या वाढदिवसामुळे आणि 'बॅटल ऑफ गलवान'च्या चर्चेमुळे हा दिवस त्याच्या चाहत्यांसाठी अधिकच खास ठरला आहे.



## प्रसिद्ध अभिनेता अन् दिग्दर्शकाचा मृत्यू

**सिनेविश्वातून एक दुख:द बातमी समोर येत आहे. पॅलेस्टिनी दिग्दर्शक आणि अभिनेता मोहम्मद बकरी यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मोहम्मद बकरी यांनी आपल्या कारकिर्दीत अरबी आणि हिब्रू या दोन्ही भाषांमध्ये काम केले आहे. दरम्यान, मोहम्मद बकरी यांच्या निधनाची कुटुंबाने अधिकृत माहिती दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बकरी यांना २००३ साली रिलीज झालेल्या मजेनिन,जेनिनफया डॉक्यूमेंट्रीमुळे प्रसिध्दी मिळाली होती. या डॉक्यूमेंट्रीचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. दरम्यान, या डॉक्यूमेंट्रीवर इस्रायलने बंदी घातली होती.**



मोहम्मद बकरी यांच्या निधनाची बातमी पसरताच चाहत्यांनी शोक व्यक्त केला आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, मोहम्मद बकरी यांचा जन्म २७ डिसेंबर १९५३ रोजी इस्रायलमध्ये झाला होता. त्यांनी २०२५मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ऑल दॅट्स लेफ्ट ऑफ यू' या चित्रपटात काम केले होते. हा चित्रपट एका पॅलेस्टिनी कुटुंबाच्या कथेवर आधारीत होता. या चित्रपटात मोहम्मद बकरी यांची २ मुलं, एडम आणि सा-लेह बकरी यांनी देखील मुख्य भूमिका साकारली होती. त्यांच्या अभिनयाचं प्रेक्षकवर्गाकडून कौतुकही करण्यात आलं होतं. विशेष म्हणजे अकादमी अवॉर्ड्सने या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट आतंरराष्ट्रीय फीचर फिल्म साठी शॉर्टलिस्ट केले आहे.

गेल्या काही वर्षात, त्यांनी पॅलेस्टिनी लोकांच्या अनुभवांचे वेगवेगळे पैलू दर्शविणारे अनेक चित्रपट तयार केले आहेत. बकरी यांनी आपल्या कारकिर्दीत हिब्रू भाषेतही काम केलंय. १९८० आणि १९९० या काळात त्यांनी अनेक प्रसिद्ध इस्रायल चित्रपटांमध्ये काम केलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी तेल अवीव विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. मोहम्मद बकरी यांनी चित्रपट आणि रंगभूमी दोन्ही माध्यमात उत्तम काम केले. त्यांनी अभिनय क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली. लेखक एमिल हबीबी यांच्या लेखनावर आधारीत १९८६ साली वन मॅन शो 'द पेसोप्टिमिस्ट' प्रदर्शित झाला होता. या चित्रपटातही त्यांनी भूमिका साकारली होती. दरम्यान, मोहम्मद बकरी यांच्या निधनामुळे सिनेविश्व तसेच चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, बुधवारी त्यांचे हृदय आणि फुफ्फुसांच्या गंभीर आजारांमुळे निधन झाले. त्यांचे चुलत भाऊ रफिक बकरी यांनी अरबी वृत्तसंस्था अल जरमकला सांगितले की, मोहम्मद बकरी यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून लोकांसाठी आवाज उठवला. मोहम्मद बकरी यांनी त्यांच्या कारकिर्दीत, विविध पैलूंचे चित्रण करून असंख्य चित्रपटांची निर्मिती केली. तसेच अभिनयही केला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत हिब्रू भाषेतही अभिनयही केला. त्यांनी तेल अवीवमधील इस्रायलच्या राष्ट्रीय नाट्यगृहात रंगमंचावर सादरीकरण केले.

## मुंबईतील पॉश इमारतीला भीषण आग बॉलिवूड निर्माते थोडक्यात बचावले



मुंबई-मुंबईतील गगनचुंबी आणि पॉश इमारतींमधील आगीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अशातच अंधेरी वेस्टच्या सोरेंटो सोसायटीमध्ये गुरूवारी भीषण आगीची घटना घडली आहे. आगीनं काही क्षणात रौद्ररूप धारण केले होते. या आगीमुळे १२व्या, १३ व्या आणि १४व्या मजल्यावर गोंधळ उडाला होता. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते संदीप सिंह यांच्या घराला देखील आगीनं विळखा घातला होता. निर्माता संदीप सिंह यांचे घर सोरेंटो सोसायटीच्या १४ व्या मजल्यावर होते. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांचे कुटुंब आता सुरक्षित असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर अभिनेत्री अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांनी घटनास्थळी जाऊन त्यांची मदत केली.

**नेमकं घडलं काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सकाळी १० वाजेच्या

### अंकिता लोखंडेकडून मदतीचा हात

सुमारास अंधेरी पश्चिम येथील २३ मजली सोरेंटो टॉवरला भीषण आग लागली होती. काही क्षणात १२व्या, १३ व्या आणि १४व्या मजल्यावरून धुराचे लोट पाहायला मिळत होते. आगीनं अनेक घरांना विळख्यात घेतलं होतं. मुख्य म्हणजे आगीमुळे इलेक्ट्रिकल डक्ट तसेच केबल्स जळून खाक झाल्या. यामुळे इमारतीमध्ये काही क्षणात धुराचे साम्राज्य निर्माण झाले. आग पसरताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. तसेच शर्थीने आग विझवण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, अग्निशमन दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे तातडीने सुमारे ४० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. माहितीनुसार, या आ-गीचा फटका १४ व्या मजल्यालाही बसला. १४ व्या मजल्यावर प्रसिद्ध चित्रपट निर्माते संदीप सिंह यांचे घर आणि ऑफिस आहे. त्यांच्या घरालाही आग ला-गली होती. त्यांच्यावर अलिकडेच हर्नियाचं ऑपरेशन झाले होते. त्यांना डिस्चार्ज देण्यात आले होते. मात्र, त्यानंतर ते राहत असलेल्या टॉवरला भीषण आग लागली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोनुसार, संदीप यांना कोणतीही दुखापत झालेली नसल्याचं दिसून येत आहे.घटनेची माहिती मिळताच संदीप यांची मैत्रीण मदतीसाठी धावून गेली. अभिनेत्री अंकिता लोखंडे आणि तिचा पती विकी जैन तातडीने संदीप यांच्या घरी गेले.

## धुरंधरसमोर सगळेच फिके! बॉक्स ऑफिसवर रणवीर अक्षय खन्नाचा दबदबा कायम

बॉलिवूडसाठी २०२५ हे वर्ष आतापर्यंत अत्यंत यशस्वी ठरले आहे. यंदा अनेक मोठे आणि दर्जेदार चित्रपट प्रदर्शित झाले असून त्यांनी बॉक्स ऑफिसवर घवघ-वीत यश मिळवले आहे. विशेषतः ख्रिसमसच्या सुट्टीच्या काळात थिएटरमध्ये अनेक चित्रपटांनी हजेरी लावली. मात्र, या सगळ्यांमध्ये रणवीर सिंगचा बहुचर्चित चित्रपट 'धुरंधर' गेल्या तीन आठवड्यांपासून बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. रणवीर सिंग अभिनीत 'धुरंधर'ने ख्रिसमसच्या दिवशीही आपली आघाडी कायम ठेवली. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, २५ डिसेंबर रोजी या चित्रपटाने तब्बल २६ कोटी रुपयांची कमाई केली आहे. ख्रिसमसच्या दिवशी सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरण्याचा मान 'धुरंधर'ने पटकावला असून, इतर कोणताही चित्रपट त्याच्याशी स्पर्धा करू शकलेला नाही. सलग तिसऱ्या आठवड्यातही प्रेक्षकांचा ओघ कायम असल्याचं स्पष्ट झालं आहे.

'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी'ची ओपनिंग

कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांचा रोमँटिक-कॉमेडी चित्रपट 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' ख्रिसमसच्या दिवशी प्रदर्शित झाला. मात्र, पहिल्या दिवशी चित्रपटाला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. सॅकनिल्कच्या



आकडेवारीनुसार या चित्रपटाने पहिल्या दिवशी केवळ ७.५० कोटी रुपयांची कमाई केली आहे. वीकेंडला कमाई वाढण्याची शक्यता असली तरी ओपनिंग तुलनेने कमकुवत मानली जात आहे.मोहनलाल यांच्या 'वृषभ'ची निराशाजनक कामगिरी दक्षिणेतील सुपरस्टार मोहनलाल यांचा 'वृषभ' हा चित्रपटही ख्रिसमसच्या मुहूर्तावर प्रदर्शित झाला. मात्र, बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाला प्रचंड अपयशाचा सामना करावा लागला आहे. पहिल्याच दिवशी हा चित्रपट १ कोटींचाही टप्पा गाठू शकला नाही. अवघी ७० लाख रुपयांची कमाई करत 'वृषभ'चा खराब ओप-निंग डे नोंदवला गेला आहे.

हॉलीवूडचा 'अवतार: फायर अँड ऐश'ही स्पर्धेत ख्रिसमसला रणवीरच्या 'धुरंधर'ला थेट टक्कर देणारा हॉलीवूड चित्रपट म्हणजे 'अवतार: फायर अँड ऐश'. हा चित्रपट गेल्या काही काळापासून बॉक्स ऑफिसवर टिकून आहे. गुरुवारी या चित्रपटाने १३.५० कोटी रुपयांची कमाई केली असून, भारतीय प्रेक्षकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो आहे.

'अखंडा २'ची दमदार कमाई

तेलगू सुपरस्टार नंदमुरी बालकृष्ण यांचा 'अखंडा २' देखील ख्रिसमसच्या सुट्टीचा फायदा घेत जोरदार कमाई करत आहे. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, या चित्रपटाने ख्रिसमसच्या दिवशी १२.५० कोटी रुपयांची कमाई केली आहे. तेलुगू व्हर्जनमध्ये हा चित्रपट सर्वाधिक कमाई करणाऱ्यांमध्ये आघाडीवर आहे.

# मानवी तस्करीविरोधातील निर्णायक लढा : लातूर पोलिसांचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष

**लातूर/प्रतिनिधी :** मानवी तस्करी हा केवळ कायद्याचा प्रश्न नसून तो समाजाच्या नैतिकतेला, मानवतेला आणि सुरक्षिततेला दिलेले गंभीर आव्हान आहे. महिला, बालके आणि दुर्बल घटकांना आमिष, फसवणूक, बळजबरी, आर्थिक गरिबी किंवा अज्ञानाचा फायदा घेऊन लैंगिक शोषण, सक्तीची मजुरी, बालमजुरी, घरगुती गुलामी किंवा वेश्याव्यवसायाच्या दलदलीत लोटले जाते. अशा अमानवी, क्रूर आणि संघटित स्वरूपाच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (Anti-Human Trafficking Unit - AHTU) ची स्थापना करण्यात आलेली आहे.

लातूर जिल्ह्यात कार्यरत असलेला हा विशेष कक्ष केवळ गुन्हे नोंदविणे किंवा छापे टाकणे इतक्यापुरता मर्यादित नसून, मानवी तस्करीच्या मुळावर घाव घालणे, पीडितांचे जीवन पुन्हा उभे करणे आणि समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे या व्यापक उद्देशाने सातत्याने कार्यरत आहे.

**मानवी तस्करी : एक गंभीर सामाजिक व राष्ट्रीय समस्या**

मानवी तस्करी हा आंतरराज्यीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा गुन्हा असून त्यामागे संघटित टोळ्या, दलाल, आर्थिक स्वार्थ आणि अमानवी मानसिकता कार्यरत असते. विशेषतः महिला व बालके या गुन्ह्यांचे प्रमुख बळी ठरतात. काम, शिक्षण, लग्न किंवा चांगल्या जीवनाचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक




केली जाते. अशा परिस्थितीत पीडित व्यक्ती केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक, भावनिक आणि सामाजिकदृष्ट्याही उद्ध्वस्त होते. याच पार्श्र्वभूमीवर लातूर पोलीस दलाने मानवी तस्करीविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका स्वीकारून AHTU कक्षाला अधिक सक्षम, संवेदनशील व परिणामकारक बनविले आहे. AHTU कक्षाची भूमिका व उद्दिष्टे लातूर येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष हे - महिला व बालकांची बेकायदेशीर खरेदी-विक्री रोखणे,जबरदस्तीने वेश्याव्यवसाय किंवा मजुरी करून घेणाऱ्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांचा पर्दाफाश करणे,हरवलेल्या, अपहृत किंवा फसवून नेलेल्या महिला व मुलांचा शोध घेण्यात येतो.पीडितांना सुरक्षित वातावरण, कायदेशीर मदत व पुनर्वसन उपलब्ध करून देऊन मानवी तस्करीविरोधात समाजात जागरूकता निर्माण करणे या प्रमुख उद्दिष्टांसाठी कार्य करीत आहे.

**कायद्याची कठोर अंमलबजावणी व तपास**

AHTU कडून मानवी तस्करीशी संबंधित प्रकरणांमध्ये Immoral Traffic (Prevention) Act (PITA), भारतीय न्याय संहिता, बाल न्याय अधिनियम, बालमजुरी प्रतिबंधक कायदा इत्यादी कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येते. गुन्ह्यांचा तपास करताना आधुनिक तंत्रज्ञान, गुप्त माहिती, आंतरराज्यीय समन्वय आणि पुराव्यांचे शास्त्रीय संकलन यावर भर दिला जातो. छापे, सुटका व पुनर्वसन हॉटेल, लॉज, ढाबे, मसाज पार्लर, बार, खासगी घरे तसेच संशयास्पद ठिकाणी अचानक छापे टाकून AHTU कडून पीडित महिला व बालकांची सुटका केली जाते.

सन २०२५ मध्ये लातूर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात सपोनी श्री तिडके व त्यांचे अंमलदार यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली AHTU कडून सन २०२५ मध्ये खालीलप्रमाणे प्रभावी कार्यवाही करण्यात आली..**

**मिसिंग प्रकरणे**

मिसिंग महिला : ६१०
शोध लागलेल्या : ५२६
मिसिंग पुरुष : ३८६
शोध लागलेल्या : ३२५

**अपहरण प्रकरणे.**

मुली : १८३ । मिळाले : १५६
मुले : ४५ । मिळाले : ४२
झखढ- अंतर्गत कारवाई.
एकूण गुन्हे दाखल : ०९
आरोपी : ३१
पीडित सुटका : १६

**बालकामगार / PITA अंतर्गत कारवाई.**

एकूण गुन्हे दाखल : ०३
आरोपी : ०३
पीडित सुटका : १०
९ ऑपरेशन शोध

ऑपरेशन शोध मोहीम-०१ ही १७ एप्रिल २०२५ ते १५ मे २०२५ या कालावधीत राबविण्यात आली त्यात खालील प्रमाणे कामगिरी केलेली आहे.

**मिसिंग शोधले : २२९**

**अपहरण शोधले : ०८**

ऑपरेशन शोध मोहीम-०२ ही मोहीम १४ जुलै २०२५ ते २१ जुलै २०२५ या कालावधीत राबविण्यात आली त्यात खालील प्रमाणे कामगिरी केलेली आहे.

मिसिंग शोधले : ४८६
अपहरण शोधले : ११

राज्यस्तरीय ऑपरेशन शोध मोहीम ०१ नोव्हेंबर २०२५ ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आली त्यात खालील प्रमाणे कामगिरी केलेली आहे.

मिसिंग शोधले : ८८
अपहरण शोधले : १६
इतर कारवाई

गुन्हे प्रकरणात एकूण ०४ लॉजेस सील करण्यात आले. याप्रमाणे प्रभावी कारवाई करण्यात आली आहे. एकंदरीत सन २०२५ मध्ये लातूर AHTU कडून शेकडो महिला, पुरुष व बालकांचा शोध घेऊन त्यांना सुरक्षित जीवनाकडे परत नेण्यात आले. PITA अंतर्गत गुन्हे दाखल करून अनेक आरोपींना अटक करण्यात आली, पीडितांची सुटका करण्यात आली तसेच काही लॉजेस व आस्थापना सील करण्यात आल्या. ही कामगिरी लातूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे व सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

तसेच गुन्ह्यातील सुटका झाल्यानंतर पीडिताची वैद्यकीय तपासणी करणे, त्याचे समुपदेशन, सुरक्षित निवारा गृहात दाखल करणे,बालकल्याण समितीमार्फत पुढील कायदेशीर प्रक्रिया अशा सर्व बाबी संवेदनशीलतेने राबविल्या जातात. AHTU कडून रेल्वे स्टेशन, बसस्थानके, धार्मिक स्थळे, सार्वजनिक ठिकाणी विशेष शोध मोहिमा राबविल्या जातात. सापडलेल्या महिला व मुलांना त्यांच्या कुटुंबियांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे ही या कक्षाची महत्त्वाची जबाबदारी आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे तुटलेले संसार पुन्हा एकत्र येण्यास मदत झाली आहे.

**जनजागृती – गुन्ह्यांच्या प्रतिबंधाचा मजबूत पाया**

मानवी तस्करी रोखण्यासाठी केवळ पोलीस कारवाई पुरेशी नाही, तर समाजाचा सहभाग अत्यावश्यक आहे. यासाठी AHTU कडून शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भाग, औद्योगिक क्षेत्रात जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत. नागरिकांनी संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येते. मानवी तस्करी, बालमजुरी किंवा संशयास्पद हालचालींबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ - पोलीस हेल्प लाईन: डायल ११२ आणि बालका संदर्भात १०९८ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

लातूर पोलीस दलामधील कार्यरत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष हा केवळ एक पोलीस विभाग नसून तो मानवतेचे रक्षण करणारी, पीडितांना नवे आयुष्य देणारी आणि समाजाला सुरक्षित बनविणारी प्रभावी यंत्रणा आहे. महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी लातूर पोलीस दल सदैव सज्ज असून, मानवी तस्करीसारख्या अमानवी गुन्ह्यांविरोधात त्यांचा लढा अधिक तीव्र, व्यापक व निर्णायक राहणार आहे.

## रामभाऊ सगरे यांचा प्रयोग तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रथम



**निलंगा/आयुब बागवान:** निलंगा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिल्हा परिषद प्रशाला निलंगा येथे संपन्न झाले.याचे उद्घाटन मुख्याध्यापक खरटमोल एम बी यांच्या हस्ते झाले. शिक्षक संवर्गातून तसेच प्राथमिक गटातून तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक येण्याचा मान सगरे यांना मिळाला याबद्दल गटशिक्षणाधिकारी स्वामी संतोष व बीआरसी स्टॉप,कन्या प्रशालेच्या प्रभारी मुख्याध्यापिका नागमोडे सरस्वती जाधव एम. एम., गुंजीटे ए. ए. वाघमारे मोहनराव, सय्यद याकुब अर्चना माने ,सुनिता पाटील, सुंदर बोन्डगे ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष परमेश्वर कांबळे या सर्वांनी रामभाऊ सगरे यांचे अभिनंदन केले . जिल्हा परिषद कन्या प्रशाला निलंगा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.ल

## समाज विकासातील अल्पसंख्याकांचे योगदान समजून घ्यावे - प्रा.फ.म.शहाजींदे

**निलंगा/आयुब बागवान:** अल्पसंख्यांक समाज व जातीचा विचार केला तर त्यात अनेक जाती व धर्मांचा समावेश होतो. परंतु अलीकडे अल्पसंख्याकांची व्याख्या बदलत चाललेली आहे. ही भूमिका बदलण्याची गरज आहे. वारकरी संप्रदायाबरोबरच सुफी संप्रदायानेही महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेला समृद्ध केलेले आहे. शेख महंमद, शहामुनी यासारख्या सुफी संत कवींनी मराठीत साहित्य निर्मिती करून ही भक्ती परंपरा समाजात रुजवलेली आहे. समाज विकासातील त्यांचे हे कार्य महत्त्वपूर्ण आहे असे मत कवी, कादंबरीकार ज्येष्ठ साहित्यिक प्रा.फ.म.शहाजींदे यांनी व्यक्त केले आहे.निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित ''अल्पसंख्यांक समाज: हक्क आणि जाणीव जागृती'' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी अल्पसंख्यांकांच्या बदलत्या व्याख्येबद्दल चिंता व्यक्त केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता,न्याय हा विचार समाजात रुजण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचा उद्देश व भूमिका डॉ . गोविंद शिवशेट्टे यांनी मांडली. विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय व लातूर येथील राजर्षी शाहू व महाविद्यालय (स्वायत्त ) या दोघांमध्ये सामंजस्य करार

**निलंगा/आयुब बागवान:** निलंगा महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा चे प्राचार्य तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड चे विद्या परिषद सदस्य डॉ.कर्मवीर कदम आणि राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड चे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महादेव गव्हाणे या दोघांनी सामंजस करारावर सह्या केल्या.यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालय , लातूरचे उप-प्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, महाराष्ट्र महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. गोपाळ मोघे यांची उपस्थिती होती. या करारामध्ये शैक्षणिक संस्थेमध्ये होणाऱ्या विविध विकासाचे आदान प्रदान, अभ्यासोतर व अभ्यास पूरक,क्रीडा प्रशिक्षण शिबिर ,संयुक्त अभ्यास मंडळ शैक्षणिक, संशोधनात्मक माहितीचे आदान प्रदान विद्यार्थी व प्राध्यापक यांचे विविध प्रशिक्षण उदबोधन वर्ग मेडिकल कॅम्प ,फिटनेस कॅम्प, या सर्व माहितीचे आदान-प्रदान करण्याचे ठरवण्यात आले.

नुकतेच शाहू महाविद्यालय लातूर यांना मराठवाड्यातील पहिले महाविद्यालय म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा ''एम्पावर्ड ऑटोनॉमस'' हा दर्जा प्राप्त झालेला आहे.

या सामंजस्य कराराबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष मा विजय पाटील साहेब यांनी



## दयानंद विज्ञानच्या प्रा.संध्या जाधव यांना पीएच.डी.



**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्रा.संध्या जाधव यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी.पदवी प्रदान केली आहे.त्यांनी भौतिकशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. विश्वनाथ मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्टडीज ऑन एमजी अँन्ड एमएन डोपड् झिंक ऑक्साईड थीन फिल्म्स व्हाया स्प्रे पायरोलिसीस टेक्निक या विषयावर विद्यापीठात शोध प्रबंध दाखल केलेला होता.त्यांची विशेष बाब म्हणजे गॅस सेन्सरवर त्यांना जर्मन आंतरराष्ट्रीय पेटंट मिळालेले आहे. या संशोधनाचा मुख्य उपयोग अमोनिया या विषारी वायूचे संवेदन करण्यासाठी असून हे संशोधन औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण,कामगारांचेआरोग्य संरक्षण व पर्यावरण सुरक्षेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे.तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय स्कोपस जर्नल्समध्ये एकूण ०४ शोधनिबंध प्रकाशित आहेत.त्याबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,नॅक समन्वयक डॉ.शंकर बिराजदार, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी.एच.मुजावर, डॉ.एम.बरोटे, डॉ.सी. टी. लोंढे,डॉ.संतोष भिसे, डॉ.श्वेता लोखंडे,प्रा.मेघा आत्राम, प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## राज्यस्तरीय शालेय रस्सीखेच स्पर्धेत मुकुंदराज विद्यालयातील मुलींच्या संघाचे घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद नांदेड व जिल्हा टग ऑफ वार असोसिएशन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धेत मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव येथील १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट आणि दमदार खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावत ब्रांझ मेडल व ट्रॉफी मिळवली आहे.

राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धा दि. १७ डिसेंबर रोजी नांदेड येथील सिडको परिसरातील तालुका क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडली. या मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुलींच्या संघाने कडव्या स्पर्धेत सातत्यपूर्ण खेळ करत तृतीय क्रमांक मिळवला आहे. ग्रामीण भागातून आलेल्या या संघाच्या सातत्यपूर्ण यशामुळे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, खेळाला कोणतीही सीमा नसून इच्छाशक्ती, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर मोठी उंची गाठता येते.

या स्पर्धेसाठी प्रशिक्षक व मार्गदर्शक शेप बी. एम., इरशाद शेख तसेच क्रीडा शिक्षक व्ही. जी. ढाकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे व खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे यश साध्य झाले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक श्री. मुंढे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विजेत्या खेळाडू व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रेल्वे, सोलापूर विभागातील सोलापूर, कलबुरगि आणि वाडी स्थानकांमार्गे मुंबई आणि हैदराबाद दरम्यान नवीन वर्षासाठी विशेष गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे, सोलापूर विभागातील सोलापूर, कलबुरगि आणि वाडी स्थानकांमार्गे मुंबई आणि हैदराबाद दरम्यान नवीन वर्षासाठी विशेष गाड्या चालवणार आहे, ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-हैदराबाद नवीन वर्षाच्या विशेष गाड्या

गाडी क्रमांक ०७४५८ हैदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई नवीन वर्षाची विशेष गाडी रविवार २८.१२.२०२५ रोजी हैदराबाद येथून सायंकाळी ०५:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०:४० वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७४५९ लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-हैदराबाद नवीन वर्षाची विशेष गाडी सोमवार २९.१२.२०२५ रोजी एलटीटी मुंबई येथून दुपारी ०३:२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०९:०० वाजता हैदराबाद येथे पोहोचेल.



थांबे: बेगमपेट, लिंगमपल्ली, विकाराबाद, तांडूर, वाडी, कलबुरगि, सोलापूर, पुणे आणि कल्याण.

संरचना: १ फर्स्ट एसी कम एसी-II टायर, २ एसी-II टायर, ५ एसी-III टायर, १० स्लीपर क्लास, २ सेकंड क्लास आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन. (२२ डबे)

आरक्षण आणि बुकिंग:

विशेष दरांवर विशेष गाड्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर खुले आहे.

आरक्षित नसलेल्या डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवरील बुकिंग काउंटरवर आणि यूटीएस ॲपद्वारे देखील करता येईल. प्रवाशांना विनंती आहे की गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटासह प्रवास करावा.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तब्बल १९ वर्षांनी आले एकत्र, जुन्या वर्गमित्रांची पुन्हा भरली शाळा! जुन्या आठवणींना मिळाला उजाळा

## २००६ मधील दहावी बॅचचा नरेंद्र आर्य विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन




धाराशिव(प्रतिनिधी)-:अरे कसा आहेस. अय्या ओळखलंच नाही. तब्येत काय म्हणतेय. अगं कुठे असतेस. मिस्टर काय करतात. मुले किती आहेत. दहावीनंतर पुढे काय केले. ती आली नाही का. तो कुठे असतो. ती सध्या काय करतेय. नोकरी काय म्हणतेय. भावोजी काय करतात. वहिनी कुठल्या आहेत आणि त्या काय करतात. तुझा व्यवसाय कसा चालला आहे. शेती काय म्हणतेय. गावाकडे आल्यावर कोणी भेटतं का. सध्या काय चाललंय. तुला तो आठवतो का. हा तोच तो. असे एक ना अनेक प्रश्न एकमेकांना विचारत आणि सुख-दु:खाचे प्रसंग सांगत तालुक्यातील मौजे.आपसिंगा येथील नरेंद्र आर्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि शिक्षकांनी तब्बल एकोणीस वर्षांनी एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. निमित्त होते शाळेच्या २००६ मधील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे. यावेळी सर्वांनी एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. तसेच सर्वांच्या वतीने सौर ऊर्जा कॅमेरा मोठ्या आनंदाने भेट देण्यात आला.

स्थानिक माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने या स्नेहमेळाव्याचे सुंदर असे आयोजन करण्यात आले होते. नोकरीच्या निमित्ताने विविध ठिकाणी वास्तव्यास असलेले माजी विद्यार्थी आणि लग्न होऊन सासरी गेलेल्या व राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थिनी यांनी आपापल्या मित्र-मैत्रिणींना संपर्क करून हा स्नेहमेळावा आयोजित केला होता. त्यामध्ये लातूर, धाराशिव, सोलापूर, हैद्राबाद व पुणे जिल्ह्याच्या परिसरातून सुमारे ५० माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून उपस्थित सर्व गुरूजनांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन येथोच्छित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अनेकांनी शाळेसह जीवनातील अनुभव ते आजपर्यंतचा जीवन प्रवास शब्दात उलगडला. तसेच जुन्या आठवणींना उजाळा दिल्याने अनेकजण गहिवरले.

'अशी पाखरे येती... आणि स्मृती ठेवूनी जाती' या काव्य पंक्तीप्रमाणे शालेय जीवनात अनेक बॅचनी पाचवी ते दहावीपर्यंत एकत्र शिक्षण घेतले. कोणी पुढील शिक्षणासाठी, नोकरी किंवा व्यवसायासाठी पुणे, मुंबई तसेच अन्य ठिकाणी निघून गेले. तरीही शालेय जीवनातील मित्रांसोबतच्या आठवणी मात्र काढत राहिले. याच जुन्या आठवणींना पुन्हा नव्याने उजाळा देण्यासाठी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल १९ वर्षांनी एकत्र येत हा आठवणीपर स्नेहमेळावा आयोजित केला. एक महिना अगोदर बॅचच्या व्हाटसअप ग्रुपवर तारीख ठरवून आपल्या नोकरी, व्यवसायाच्या व्यापातून वेळ काढून कोणी धाराशिव, लातूर, सोलापूर, पुणे जिल्ह्यातून आतुरतेने शाळेत जुन्या विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी हजर राहिले. प्रारंभी सर्वांनी फेटे बांधून कार्यक्रमाचा आनंद लुटला. तसेच पूर्ण दिवस आनंदात घालवला. यावेळी शालेय जीवनातील शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करुन विद्यार्थ्यांनी ऋणानुबंध अधिक घट्ट केले.

दरम्यान, या दहावीच्या बॅचने केलेल्या उत्कृष्ट स्नेहमेळावा सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे इतरही बॅचच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळावा घेण्यासाठी प्रवृत्त झाले आहेत. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक जयराज सुर्यवंशी यांनी अध्यक्षस्थान भूषविले. याप्रसंगी शिक्षक बाळकृष्ण गोरे, तुकाराम गोरे, सुमित्रा खंदारे, शरद गोरे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर सिरसाठ, अर्जुन गोरे, ज्ञानेश्वर हेडे, शंकर गिरी, सुनील क्षीरसागर, शक्ती पांडागळे, समाधान पारधी, चंद्रकांत सोनवणे, नाना गादे आणि राहुल गुरव यांनी विशेष परिश्रम घेतले.

**...तर जिलेबीने आणली भोजनात रंगत, गोड झाली सर्वांची पंगत!**

मुंबई येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत ताई हजारे यांच्या वतीने स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने उपस्थित सर्वांसाठी गरमागरम चपाती, पनीर, जिरा राईस, भजी, पापड आणि स्वीटमध्ये जिलेबी, अशा स्वादिष्ट व रूचकर भोजणाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मनोगते व्यक्त करताना पाणावलेल्या डोळ्यांना जिलेबीच्या गोडव्याने दिलासा दिला. परिणामी, सर्वांनी जिलेबीचा भरपेट आस्वाद घेतला. त्यामुळे जिलेबीने आणली भोजनात रंगत, गोड झाली सर्वांची पंगत! असे अमोल कांबळे यांनी म्हणताच त्यांना सर्वांनी हसून दाद दिली.

**जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीसाठी यांनी घेतला पुढाकार!**

काही वर्षांपूर्वी माजी विद्यार्थ्यांनी व्हाटसअप ग्रुप काढला. यामध्ये जवळपास सर्व माजी विद्यार्थी सामील झाले. या माध्यमातून संवाद साधत होते. एकमेकांच्या सुख दु:खात सोबत होते. परंतु नोकरीच्या, व्यवसायाच्या व्यापामुळे स्नेहमेळाव्याचे नियोजन होत नव्हते. यावर्षी एक महिना अगोदर तारीख ठरवून सर्वांनी एकत्र भेटायचे ठरवले. त्यामुळे सागर सिरसाठ, अर्जुन गोरे, अमोल कांबळे, रेहान काझी, सौदागर गायकवाड, आशा हजारे, राणी तोडकरी, शुभांगी इंगळे, सुकुमार माने, सुषमा घोलकर, सुवर्णा जमदाडे, सारीका रोंगे, अश्विनी कुंभार, पल्लवी सगरे, श्रीदेवी गोरे, रेणुका अंदाने, अमरजा क्षीरसागर आणि उज्वला खोचरे यांनी पुढाकार घेतला. परिणामी, तब्बल १९ वर्षांनी त्याच जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्याचा योग आला.

**विद्यार्थ्यांची भावुक मनोगते, सन्मानामुळे शिक्षक भारावले!**

शिक्षकांचे मार्गदर्शन आणि उत्तम ज्ञानदानामुळे हे सर्व विद्यार्थी उद्योग-धंदा, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, शेती, शासकीय सेवेसह विविध खासगी कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. तसेच आपापल्या क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. त्यांच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान असल्याने शिक्षकांचा सन्मान यावेळी करण्यात आला. त्यामुळे शिक्षक सुद्धा अगदी भरावून गेले. तसेच त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शिक्षणाचे महत्त्व आधोरेखित केले.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAYYED TAYYABA SALIMODDIN**
TO: **TAYYABA ALIMODDIN SAYYED**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **TAYYABA ALIMODDIN SAYYED** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SAYYED TAYYABA S ALIMODDIN**
NEW NAME :- **TAYYABA ALIMODDIN SAYYED**
Address - Inamdar Galli Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-854651358051
Mob.9370927027

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **WAGHMARE DATTATRAYA SHIVAJI**
TO: **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **WAGHMARE DATTATRAYA SHIVAJI**
NEW NAME :- **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-581577172492
Mob.9764176997

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAYYED TAYYABA S ALIMODDIN**
TO: **TAYYABA ALIMODDIN SAYYED**
Hence for this Declaration i will be known by this name and will use TAYYABA ALIMODDIN SAYYED in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SAYYED TAYYABA S ALIMODDIN**
NEW NAME :- **TAYYABA ALIMODDIN SAYYED**
Address - Inamdar Galli Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-854651358051
Mob.9370927027

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **WAGHMARE DATTATRAYA SHIVAJI**
TO: **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE** in future the same will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- **WAGHMARE DATTATRAYA SHIVAJI**
NEW NAME :- **DATTATRYA SHIVAJI WAGHMARE**
Address - 1538 Bhavani Nagar,Naldurg. Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-5815 7717 2492 Mob.9764176991


# शहरात अण्णाभाऊ साठे चौक येथील नियोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक जागेमध्ये पुतळा उभारावा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-शहरात अण्णाभाऊ साठे चौक येथील नियोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक जागेमध्ये पुतळा उभा करण्यात यावा यासाठी तत्कालीन नगरसेविका सिंधुताई पेठे यांनी नगर परिषदेच्या सभागृहात ठराव क्रमांक २२२ मांडला. त्या ठरावास सभागृहांने एक मताने मंजुरी दिली. त्या ठरावाच्या अनुषंगाने नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभा करण्यासाठी दि.३० जुलै २०१२ ला कार्यकारी अभियंता, पोलीस अधीक्षक व नगर विकास विभागाचे सचिव यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी पत्राद्वारे मागणी केली. त्यानुसार दि.१२ डिसेंबर २०१५ ला महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक आरओडी/१०९९/२६५८७ (३०९/९९) रस्ते-४ दि.४/२/२००४ च्या निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यावर, पथ किनारावरती क्षेत्रात कोणत्याही प्रकारचा पुतळा उभारण्यासाठी परवानगी देण्याची मनाई केली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा पुतळा उभारल्यास संबंधितावर कारवाई करण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असल्यामुळे ना हरकत प्रमाणपत्र देण्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे आ राणाजगजितसिंह पाटील यांनी लो अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा नियोजित जागे लगत असलेल्या शासकीय दूध डेअरीच्या जागेत बसविण्यासाठी समाज बांधवांच्यावतीने मागणी करावी अशा सूचना दत्ता पेठे यांना दिल्या. त्या सूचनेनुसार दत्ता पेठे यांच्या अध्यक्षतेखाली समाज बांधवांची २०१८ ला बैठक घेऊन एक एकर जागा मिळावी असा एक मताने ठराव मंजूर केला. तसेच पुतळ्यासाठी दूध डेअरीची जागा देण्यात यावी अशी मागणी दि.४ जून २०१८ ला मुख्याधिकारी यांच्याकडे समाजाच्यावतीने एका निवेदनाद्वारे करण्यात आली. तर २०१५ ते २०१८ या दरम्यान समाजाच्यावतीने या पुतळा करण्यात यावा या मागणीसाठी विविध प्रकारची आंदोलने करण्यात आली. त्यामुळे नगर परिषदेने दि.११ जून २०१८ ला ठराव क्र.६ सर्वसाधारण सभेत बहुमताने दूध डेअरीची एक एकर जागा देण्याचा ठराव मंजूर केला. या ठरावानंतर दि.१७ जानेवारी २०२० ला मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना समाज बांधवांच्यावतीने निवेदन देण्यात आले. दि.२४ जानेवारी २०२० रोजी मुख्याधिकाऱ्यांनी जावक क्र.३२१/२०२० नुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे दूध डेअरीची जागा नगर परिषदेकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव पाठविला. तर जिल्हाधिकाऱ्यांनी दि.८ मार्च २०२३ ला छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला. मात्र, दुग्ध विकास व पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांनी तो प्रस्ताव अमान्य केला. त्यामुळे नगर परिषदेने जिल्हाधिकारी यांच्याकडे पुन्हा प्रस्ताव पाठविला. जिल्हाधिकाऱ्यांनी दुग्ध विकास व पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांकडे दि.२२ मे २०२४ रोजी त्याच मागणीचा प्रस्ताव पाठविला. तर आ राणाजगजितसिंह पाटील यांनी तत्कालीन दुग्ध विकास व पशुसंवर्धन, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजी दत्ता पेठे, सुमित क्षीरसागर, संतोष मोरे, संतोष पेठे व विद्या माने या शिष्टमंडळा समवेत प्रत्यक्ष भेटून मागणीचे पत्र देऊन सविस्तर चर्चा केली. त्यानंतर शासनाने दूध डेअरीची जागा पुतळ्यासाठी वर्ग करण्यात यावी असा दि.१ ऑगस्ट २०२४ ला शासन निर्णय दिला. तर दि.७ ऑक्टोबर २०२४ रोजी जागेचे मूल्यांकन २ कोटी ८ लाख रुपये निश्चित करण्यात आले. ती रक्कम संबंधित यंत्रणेकडून भरून घेण्यात यावी असे पत्र नगर परिषदेला दिले. तसेच ती जागा वनीकरण विभागाची आहे किंवा नाही ? याची पाहणी करण्याचे पत्र वन विभागास पाठवले. त्यानुसार वनीकरण विभागाने दि.३१ मार्च २०२५ ला नगर परिषदेला ना हरकत प्रमाणपत्र दिले. पोलीस विभागाचे नाहरकत घेऊन त्यानंतर नगर परिषदेने सदरील मूल्यांकन रक्कम भरू शकत नसल्याचे पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना कळविले. तर जिल्हाधिकाऱ्यांनी दि.१९ जून २०२५ ला विभागीय आयुक्त महसूल यांना सदरील रक्कम नगर परिषद भरू शकत नसल्याने ती जागा विनामूल्य देण्याची मागणी केली. तसेच आ राणा पाटील यांनी दि.२३ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री अतुल सावे व महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवून ती जागा विनामूल्य देण्याची विनंती केली. त्यानुसार दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ती जागा विनामूल्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाक्रुती पुतळा व स्मारक उभारण्याच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झाले आहेत. तो पुतळा भव्य स्वरूपात उभारणार असून समाज बांधवांचे स्वप्न वास्तवात साकारणार आहे. मात्र, पुतळा साकारण्यासाठी दत्ता पेठे यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून नगर परिषदेच्या सभागृहापासून रस्त्यावरील आंदोलने ते मंत्रालयातील सर्व प्रकारचे पत्र व्यवहार, मंत्र्यांना भेटणे व सातत्याने पाठपुरावा करण्यासह अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंतच्या लढाईत अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे या पुतळ्या उभारणी मागे खरे योगदान हे आ. राणा पाटील व दत्ता पेठे यांच्यासह सर्व समाज बाधव यांचेच आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# तुळजापूर येथुन रसवंती गृहात अज्ञात व्यक्तीने चोरले मोबाईल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मारुती अभिमन्यु रसाळ, वय ५४ वर्षे, रा.वेताळ नगर तुळजापूर ता.तुळजापूर जि. धाराशिव यांचे दोन मोबाईल फोन हे दि. २५.१२.२०२५ रोजी ११.०० वा. सु. जुने बसस्थानक समोरील रसवंती गृहात तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मारुती रसाळ यांनी दि.२५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान पोलीसांना मिळालेल्या गुप्त बातमी वरुन सुदर्शन , वय ३९ वर्षे, रा. माडवखेळ ता. जि. बीड यास ताब्यात घेवून त्याचे कडे सदर गुन्हा संदर्भात चौकशी केली. असता नमुद आरोपीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

त्यावर पोलीसांनी नमुद आरोपी कडून सदर गुन्ह्यातील माल जप्त केला असुन पुढील तपास सुरु आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649